म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : २९८८

REFBK-0023904

REFBK-0023904

Bombay Book Depot
संदर्भ निबंध २९८८
23908
29/7/83

# आमची भूमिका

या शतकाच्या पूर्वार्धात समाज प्रबोधनाची जी लाट आली होती ती उत्तरार्धात ओसरली. आता तर ती मरगळल्यासारखीच झाली आहे. त्या काळी डॉ. एम्. एन्. रॉय, डॉ. देशमुख, प्रि. आगरकर, रँग्लर परांजपे, श्री. र. धों. कर्वे या विचारवंतांनी महाराष्ट्र समाज वैचारिकदृष्टचा ढवळून काढला होता. प्रथम समाज प्रबोधन की स्वातंत्र्यप्राप्ती हा वाद पेटला होता. पण स्वातंत्र्यप्राप्ती होऊन चौतीस वर्षे लोटूनही आज समाज प्रबोधनाच्या आघाडीवर काय दिसते ? घोर निराशा ! याचाच अर्थ त्यावेळी विचारवंतांनी केलेले अंदाज खरे ठरले आहेत. सर्वच धर्म या विसाव्या शतकात कालबाह्य ठरू लागले आहेत. सर्वाधिक अनुयायी असलेला ख्रिश्चन धर्म अंधश्रद्धेने भरला आहे. त्यानंतरचा मुसलमान धर्मही तसाच आहे. त्यातील समानतेचे तत्त्व पार रसातळाला गेले आहे. धर्मनिष्ठेच्या नावाखाली मुस्लिम राष्ट्रांनी सरसहा कत्तली सुरू केल्या आहेत. विचारावर बंधने घातली आहेत. स्त्रियां-वर अन्याय होत आहेत. हिंदू धर्म तर अगदी लहान. हिंदुस्थानाबाहेर तो फारसा नाहीच. त्याची शिकवणूक जुनी आणि दिशाहीन झाली आहे. अशा-वेळी नाही म्हणायला डॉ. कोवूर यांच्या झंझावाती प्रचारामुळे मात्र गेल्या सात-आठ वर्षांत या कार्यास पुन्हा चांगले दिवस येऊ लागले आहेत.

गेल्या तीन-चार वर्षांत इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनचा प्रेसिडेंट या नात्याने मला जे भारतभर भ्रमण करावे लागले आणि मी जे अनुभवले त्यामुळे मला आशेचे किरण दिसू लागले आहेत. असोसिएशनच्या आधिपत्या-खाली ठिकठिकाणी स्थानिक बुद्धिनिष्ट संस्था स्थापन झाल्या आहेत. त्या कार्यान्वित आहेत. प्रादेशिक भाषांतून या विषयावर लेखन प्रसिद्ध होऊ लागले आहे. वर्तमानपत्रातून बुद्धिवादाला अनुकूल असे विचार आत्मस्फूर्तीने वाचक मांडू लागले आहेत.

या पार्श्वभूमीवर एक वातावरण तयार होत असता आमचे एक बुद्धि-वादी आणि अजर मित्र, इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष श्री. वा. किर्लोस्कर हे "भारतीय संस्कृती आणि बुद्धिवाद" हा निबंध प्रसिद्ध करीत आहेत. श्रीवांचा आणि माझा परिचय अलीकडचा. परंतु ऐंशीजवळ

असतानासुद्धा त्यांची विचारसरणी अढळ आहे. तरुणाच्या तडफेने त्यांनी भारतीय संस्कृतीचे बुद्धिवादी दृष्टिकोनातून केलेले आत्मनिरीक्षण आणि परीक्षण सडेतोड आणि मर्मग्राही आहे. या प्रबंधाचे वाचन मोठ्या प्रमाणावर व्हावयास पाहिजे. बुद्धिवादी संघटनांनी या बाबतीत पुढाकार घेऊन आगेकूच केली पाहिजे. निबंधाच्या प्रती मोकळ्या हाताने प्रसृत करता याव्या अशी आमची इच्छा आहे. मागणीप्रमाणे त्या सर्वत्र पुरवूच परंतु; या कार्यात आम्हास सहाय्य करण्यास मुद्रक, प्रकाशक आणि वृत्तपत्रकार यांनी हात दिल्यास एक मोठेच कार्य होणार आहे. कोटयवधी माणसांच्या विचारात बदल घडवून आणण्याचे कार्य लेखणीच्या सहाय्यानेही करावयाचे आहे हे कार्यकर्त्यांनी ध्यानात घ्यावे.

11th January 1982.

**याह्या लोखंडवाला**
President
Indian Rationalist Association

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८८
दा. क्र. २३८०८
दिनांक २१/७/७३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# विचारजागरणाचा एक तळमळीचा प्रयत्न

श्री. श्री. वा. किर्लोस्कर यांनी तथाकथित "भारतीय संस्कृतीची" बुद्धिवादी चिकित्सा सत्याहत्तर परिच्छेदांत अत्यंत कळकळीने केली आहे. एखाद्या दिवाळखोर माणसाने आपल्या हिशोबाच्या वह्या पाहाण्याचे नाकारून सर्व काही हवे तसे आहे येवढेच नव्हे तर आपले उदाहरण इतरांनी गिरविण्या-सारखे आहे असे मानावे, तशा आत्मतुष्टपणे आपण आपल्या जीवनाकडे पाहातो. जमाखर्च पाहाण्याची हिंमतच आपल्यामध्ये जणू नाही. श्रीवांनी या छोटया पुस्तिकेत आपल्या इतिहासाचा ताळेबंद दिला असून तो भारताचे कल्याण ज्यांना अभिप्रेत आहे त्यांनी हिंमतीने एकदा पाहावा. "बंधूनो, जागे व्हा, अजून वेळ गेली नाहीं तोवर जागे व्हा" हे या पुस्तकाचे पालुपद आहे. राहावत नाही अशी मन:स्थिती झाल्याने "बुडत हे जन, देखवे ना डोळा" अशा उमाळयाने त्यांनी पुस्तकातली ओळन् ओळ लिहिली आहे आणि प्रत्येक वाचकाला हे जाणवल्यावाचून राहाणार नाही.

शिकल्यासवरलेल्या मंडळींतील बौद्धिक आळस आणि जडता यांचा त्यांना उबग आला तर ते स्वाभाविकच म्हणावे लागेल. ज्यांच्यापाशी समाजाचे प्रबोधन करण्याची कुवत आहे त्यांचे हितसंबंध समाजाचे प्रबोधन न करण्यात गुंतले आहेत आणि ज्यांचे हितसंबंध अशा प्रबोधनात गुंतले आहेत त्यांना ती बौद्धिक कुवतच आपण दिलेली नाहीं. ज्यांनी नव्याचे उमदेपणाने स्वागत करावे ती मंडळी जुन्यालाच कवटाळून बसली आहेत आणि त्यांच्या आचरणा-कडे पाहून चालण्याची सवय ज्या समाज-घटकांना आहे त्यांच्या वैचारिक दास्याच्या बेडया कधीं तुटतच नाहीत. हे कसे घडवून आणायचे ही भारता-पुढील सर्वात बिकट समस्या आहे. विचारकलहाला भिणारा समाज हा गतिहीन, जड आणि करंटा असतो. आजच्या भारतीय समाजाची स्थिती बऱ्याच प्रमाणात अशी झाली आहे.

"महापुरे झाडे जातीं, तेथे लव्हाळे वाचती" असे येथे मोठ्या अभि-मानाने सांगितले जाते. झाडे प्रवाहाला नवे वळण लावण्याच्या प्रयत्नांत जातात आणि असे जाणे लव्हाळयासारखे राहाण्यापेक्षा अधिक कृतार्थतेचे आहे, हे आता शिकवण्याची नितान्त आवश्यकता आहे. आपल्याकडे शांतता

आणि समाधान यांचे भलतेच स्तोम माजवले जाते. त्या तथाकथित शांतता आणि समाधानासाठी आम्ही वाटेल ती, म्हणजे वैचारिक स्वातंत्र्याचीदेखील किंमत मोजायला तयार असतो. जुन्या समाजव्यवस्थेचे गोडवे गाणारे हे विसरून जातात की अनेकांच्या दास्यावर ती शांतता आणि ते समाधान उभारलेले होते.

श्री. श्री. वा. किर्लोस्करांनी विचार जागरण करणारे हे छोटेखानी पुस्तक लिहिले याबद्दल त्यांना धन्यवाद. देशाची चिंता बाळगणाऱ्या सर्वांनी हे अवश्य वाचावे. पुस्तकाच्या आधारे तरुण मंडळींची चर्चासत्रे घडवून आणता आली तर चांगले होईल असे वाटते.

२७–१–८२

पुणे

**यदुनाथ थत्ते**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८८
वा. क्र. २३९०७
विषय २९१५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

हजार मैलांचा प्रवास
पहिल्या पावलाने सुरू होतो.
—चिनी म्हण

१ युरोप आणि आशिया या खंडांतून आर्यांच्या टोळ्या भारतभूमीत शिरल्या असा पुराण संशोधकांचा दावा आहे. उपलब्ध ऐतिहासिक साहित्यावरून जी विधाने मांडली जातात त्यांतील हे एक आहे. भारतभूमीत वास्तव्यासाठी उतरावे असा विचार प्राचीन काली बराच प्रभावी झाला असला पाहिजे. सिंध संस्कृती, मध्य आशियातील इराक-इराण प्रदेशातील संस्कृती (मिसर) तशीच इजिप्तमधील संस्कृती, युरोपीय संस्कृती, चीन खंडातील संस्कृती अशी जगाच्या सांस्कृतिक मार्गक्रमणामध्ये अनेक उत्थापने होऊन गेली. या निरनिराळ्या खंडांमधील सांस्कृतिक घडामोडी अनेक शतके अखंड चालू होत्या, हे त्या संस्कृतींचे जे अवशेष या आधुनिक कालात सापडू लागले आहेत त्यावरून दिसून येत आहे. सापडलेल्या अवशेषामध्ये, शहरेच्या शहरे सापडत आहेत. त्यांत उत्तम रस्ते, गृहरचना, भांडी, वस्त्रे, हत्यारे अशा अनेक वस्तू असतात. त्यावरून अनुमान काढता असे दिसते की, या संस्कृतींना होऊन गेल्यास जरी हजारो वर्षे होऊन गेली तरी ज्यावेळी त्या प्रभावी होत्या, कार्यवाहीत होत्या त्यावेळी बऱ्याच प्रगल्भ सामाजिक अवस्थेत असाव्या असे दिसते.

२ या जुन्या संस्कृतींच्या बाबतीत आणखी एक साम्य दिसून येते. या सर्व संस्कृतींचा उगम, त्यांची भरभराट आणि त्यांचा अंत यात काही साम्य असते. अनेक अनुकूल गोष्टींमुळे त्यांचा उगम होतो. हवा, पाणी, स्वास्थ्य, भौगोलिक सुरक्षितता इत्यादी अनेक गोष्टींमुळे या संस्कृतींची सुरुवात होते. त्यात

राज्यकारभार, राजा, शेती, व्यापार यांची अनुकूलता मिळाल्यास या संस्कृतींना काही काळ का होईना पण स्थैर्य येते. त्यानंतर परचक्र अगर रानटी टोळ्यांच्या आक्रमणामुळे ह्यांचा अंत होतो. हे सर्व प्रकार सयुक्तिक वाटतात. त्यात काही नैसर्गिक क्रम आहे असे दिसते, वाटते. त्यातच निसर्गाच्या कोपामुळे काही संस्कृतींचा अंत झाल्याचेही दिसून येते. हे सर्व मान्य करताना एक अडचण मात्र योग्य कारणाचे अभावी तशीच राहून जाते. ती अडचण म्हणजे रानटी टोळ्यांची! पुनः-पुन्हा इतिहासामध्ये या रानटी टोळ्यांनी चांगल्या स्थिरस्थावर आणि संपन्न झालेल्या संस्कृतींचा नाश केल्याचे वाचण्यात येते. हा प्रकार काही समजत नाही. सुसंस्कृत आणि साधन, सामग्रीने पुढारलेल्या संस्कृतींना रानटी टोळ्या नामशेष करतात म्हणजे काय होते? हे असे कसे होते? याचा उलगडा नीट होत नाही. पुढारलेल्या संस्कृतींना रानटी म्हणून समजल्या जाणाऱ्या माणसांनी जर नामोहरम केले तर त्यांना रानटी कसे म्हणता येईल? याचाच दुसरा अर्थही असा होऊ शकतो की ज्यांना सुसंस्कृत म्हणून समजण्यात येत होते त्यांची संस्कृतीही नावा-पुरती वरवर दिसणारी असली पाहिजे. सुसंस्कृत आणि रानटी समाजांत फारसे अंतर नसावे असे दिसते.

२ संस्कृतीचे पहिले लक्षण म्हणजे स्वतःच्या संस्कृतीची जाणीव. आपण इतरांपेक्षा निराळे आहोत आणि हे निराळेपण आपण मेहनतीने मिळविले आहे, त्याचे संरक्षण केले पाहिजे याची जाणीव. ती जर नसेल तर ती संस्कृती कसली? स्वतःचे संरक्षण करून घेण्याची क्षमता ज्या समाजात नाही त्यामध्ये एक महत्त्वाची सामाजिक जाणीव नाही, असे म्हणावे लागेल. "समाज" ही मानवी जाणीव नुसत्या संस्कृतीवर अवलंबून नाही. एकेठिकाणी गुण्यागोविंदाने राहाणाऱ्या माणसांत सामा-जिक जाणीव उत्पन्न झालेली असतेच असे नाही. आम्ही शहरे वसविली, कालवे खणले, रस्ते बांधले, व्यापार केला, साहित्य, कला निर्माण केली याचा अर्थ या माणसांनी सामाजिक जाणीव निर्माण केली असा होत नाही. सामाजिक जाणीव उत्पन्न होण्याची क्रिया ही एक मोठी सामाजिक घटना आहे. ती

तयार होण्यास व्यक्तिशः प्रत्येक माणसामध्ये एकत्वाची, जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी लागते. व्यक्तिशः माणसाची घडण जर काही उच्च तत्त्वावर झाली नसेल तर त्यातून समाज निर्माण होत नाही. नुसता जमाव गर्दी, टोळी, गट असे काही तरी निर्माण होते. आणि जगातील सर्व जुन्या संस्कृतींबद्दल असे म्हणता येईल . सामाजिक जाणीव ही इतक्या पुराणकाली निर्माण होणे शक्यच नव्हते. समाज आणि त्याची जाणीव या घटना अगदी आधुनिक आहेत. जुन्या संस्कृतींचा नाश रानटी टोळ्यांनी केला या म्हणण्यात एकच अर्थ असू शकतो. तो म्हणजे जमावाचा. या टोळ्या माणसांच्या संख्येने इतक्या मोठ्या असल्या पाहिजेत की समृद्धीच्या लहान क्षेत्रात त्यांनी आपल्या क्रूरपणाने जय मिळवला असला पाहिजे. या समृद्ध क्षेत्रामध्ये सामाजिक जाणीव कमी पडली हे त्यांच्या विनाशाचे कारण असले पाहिजे. या विसाव्या शतकातही सामाजिक जाणीव नसलेले नुसते समुदायच नव्हेत तर देशच्या देश आहेत, मग पुरातन कालाचे काय बोलायचे !

४ अशा प्रकारे भारतातील मूळ रहिवाश्यांना दूर दूरच्या प्रदेशांतून येणाऱ्या टोळ्यांना एकसारखे तोंड द्यावे लागत असावे असे दिसते. भारतातील, त्यातल्यात्यात उत्तर भारतातील गंगा नदीच्या भल्या मोठ्या, शेकडो मैल लांबरुंद असलेल्या खोऱ्यात मूळचे भारतवासी भूमिपुत्र अगर आदिवासी अनेक शतके मोठ्या सुखासमाधानाने राहात असले पाहिजेत. जलवाहिन्यांचे मुबलक पाणी, विस्तारलेला सपाट आणि सुपीक भूप्रदेश, उत्तम हवा पाणी आणि सुखाने राहाता येण्यासारखे धान्य आणि पशुधन यांची अनुकूलता निसर्गाने अशी निर्माण करून ठेवली होती की विनासायास त्या प्राथमिक संस्कृतीतही मानव आनंदाने राहात होता. उत्तर भारतातील नद्यांची पठारे पहाता त्यात स्थायिक झालेले भूमिपुत्रही बऱ्याच मोठ्या संख्येने वास्तव्य करीत असले पाहिजेत असे साहजिकच वाटते. ही कालक्रमणा अनेक शतके चालू असता मधून मधून विनाकारणच त्या भारतीय टोळ्यांवर परदेशी रानटी टोळ्यांच्या होत असलेल्या हल्ल्याचे मूळच्या भारतीय भूमिपुत्रांना आश्चर्यच

वाटत असले पाहिजे. एक हल्ला होऊन गेल्यावर दुसरा हल्ला होण्यामध्ये मोठा कालावधी जात असल्याने, असे हल्ले होत असल्याचे एखादवेळी विस्मरणातही जात असतील. भारतीय भूमिपुत्रांची भौतिक संस्कृती अगदी तोकडी असतानाच दुरून येणाऱ्या टोळ्यांची संस्कृती निराळ्या प्रकारची होती. हे टोळीवाले म्हणजेच आर्य, असे संशोधकांचे म्हणणे आहे. एकसारखे मजल दरमजल करीत अनेक देशांतून मार्ग काढत येणारे हे टोळीवाले आर्य जरी लुटमार करून आपला जम बसवत असत तरी भौतिकदृष्ट्या बरेच पुढारलेले असले पाहिजेत. त्यांची हत्यारे बरी होती, त्यांचे विचार निराळे होते, भाषा निराळी होती. त्यांच्यावर झालेले आनुवंशिक संस्कार निराळे होते. त्यामुळे ते जेथे जात तेथे निराळे वातावरण निर्माण करीत. अशा मानवी टोळ्या पृथ्वीवर फिरत असण्याचा एक कालखंडच होऊन गेला आहे. त्यावेळी मानवाला कोठेही भटकण्यास सदर परवानगी होती. आताप्रमाणे पासपोर्ट लागत नसे. तेव्हा अशा चौकस आणि धाडसी आर्य टोळ्यांच्या कानावर दूरवर असलेल्या भारतीय समृद्ध पठाराची हकीगत गेली असणारच. सुखाने राहता येणाऱ्या जागेच्या शोधात भटके लोक नेहमीच असतात. शेवटी शोध काढीत काढीत हे आर्य लोक भारतात आले आणि भारताच्या घडणीत एक नवे युग सुरू झाले.

५ घरात एखादा पाहुणा आला तरी घरच्या मंडळींची कोण त्रेधातिरपीट उडते! या टोळ्या तर खूप मोठ्या. त्यांच्याशी कसे संबंध ठेवावे हे स्थानिक भूमिपुत्रांना समजण्यास किती कालावधी गेला असेल याची कल्पनाच करायची. हे मित्र करण्यासारखे आहेत का शत्रू आहेत हे ओळखणेही अवघड गेले असले पाहिजे. नव्याने भारतात येणाऱ्या आर्यांनाही स्थानिक रहिवाश्यांची वागणूक शोधून काढणे जड गेले असले पाहिजे. ही टोळ्यांची घटनाही एकदाच होणारी नव्हे. पाच-पन्नास वर्षांत पुनःपुन्हा येणाऱ्या या टोळ्या. एक टोळी भारतात येऊन स्थिर होईपर्यंत तिच्या मागोमाग दुसरी. काही टोळ्यांची भारतीय भूमिपुत्रांच्या वसाहतीमध्ये ओळखपाळख

होईपर्यंत नव्याने दुसऱ्या टोळ्या हजर होत असल्या पाहिजेत. ही नव्याजुन्यांची भेसळ अनेक शतके चालली असली पाहिजे. ही घुसखोरी थांबल्याचे तर्कानेच ठरवायचे झाले तर असे म्हणता येईल की जितके घुसखोर भारतीय भूमीवर मावणे शक्य होते तिथवर ही घटना चालू असली पाहिजे. आता जागा नाही असे होऊ लागल्यावरच ही मानवी भरतीची लाट थांबली असली पाहिजे. तोपर्यंत किती आर्य भारतात आले याची काही मोजदाद झालेली नाही. येवढे मात्र दिसते की, येणाऱ्या आर्यांचे आणि मूळ भारतीय भूमिपुत्रांचे जमतच गेले. त्यांच्यामध्ये मोठे संघर्ष झाल्याचा उल्लेख नाही. परस्पर मैत्रीचे संबंध जमण्यात कालावधी गेला. पण या दोन जमातींची मिळून एक नवीनच जमात निर्माण झाली. ती सर्वच भारतीय म्हणून संबोधिण्यात येऊ लागली. दोन जमातींची मिळून जेव्हा तिसरी जमात निर्माण होते तेव्हा आधुनिक शास्त्रीय शोधाप्रमाणे, ती आपल्या आई-वडिलांपेक्षा जास्ती प्रभावी असते. असेच काही झाले असले पाहिजे. अनेक शतकांच्या घटनांवरून हळूहळू निर्माण झालेल्या भारतीय संस्कृतीच्या प्रारंभाची ही कथा आहे.

६ धूसर भूतकालातील हे एक कल्पनाचित्र आहे. किती धूसर आणि किती भूत हे अंदाजाने आणि उपलब्ध असलेल्या साधन-साहित्यावरूनच ठरवायचे. एकंदरीत हिशोबाने कालक्रमाची गणना करता सुमारे चार-सहा हजार वर्षांपूर्वीचा हा काल असावा असे दिसते. या कालात आर्यांच्या टोळ्या भारतात येऊन स्थिर झाल्या होत्या. त्यांची आणि मूळ रहिवाश्यांची मिळून एक जीवनाची ठेवण ठरून गेली होती. या भूमीलाही भारताबरोबर आर्यावर्त म्हणण्याची प्रथा पडली होती. अशी ही तडजोड मोठ्या महत्त्वाची ठरणार होती, याची मात्र त्याकाळच्या रहिवाश्यांना कल्पना नव्हती.

७ उत्तर भारतातील आर्यांच्या जीवनाची शेकडो वर्षांची वाटचाल सुसूत्र आणि सुरळीत चालू झाली होती. लोक स्थायिक होऊ लागले होते. शेतीवाडी, धनधान्य पिकवीत होते. वल्कले

परिधान करून मानव, थंडीवाऱ्यापासून आपले संरक्षण करून घेत होता. एकमेकांत बोलण्यासाठी भाषा आणि लिपी निर्माण झाली होती. पशुधन-गोधन भरपूर असल्यामुळे खाण्यापिण्याची ददाद पडत नव्हती. एकंदरीत वसाहती सुखात असल्यामुळे त्यांना फुरसतही पुष्कळ होती. या फुरसतीच्या वेळात त्या-काळच्या मानाने माणसाची विचार करण्याची जेवढी मर्यादा होती तेवढी कल्पनाशक्तीही माणसे चालवू लागली होती. रानटी अवस्थेत पहिली कल्पना कशात चालत असेल तर ती भूतपिशाच्चांची. जादूटोणा, मंत्रतंत्र, चेटूक-बाधा, असे समज भरपूर प्रमाणात माणसाच्या जीवनात पक्के रुतून बसले होते. रानटी अवस्थेत माणसाच्या मनावर भीतीचा पगडा फार मोठा असतो. स्वतःच्या अल्पशक्तीचा आणि निसर्गातील महान शक्तींचा त्यास अंदाज आलेला असतो. त्यामुळे कुठे काही थोडे बिघडले तरी कशाची शाश्वती वाटत नाही. कशामुळे काय होते हे समजत नसले म्हणजे माणसाची अवस्था भ्रमिष्ट-प्राय होते. काय करावे हे त्यास समजत नाही. मग तो भलतेच काही करू लागतो. या भावनेतूनच भूतपिशाच्चांच्या, चेटूक-मंत्रांच्या कल्पना निघू लागतात. अशा कल्पनांचा सुळसुळाट एकेकाळी या आर्यावर्तात भरपूर प्रमाणात आढळतो.

काल सारखा वाहात असतो, या नियमाला धरून प्राचीन भारतीय वसाहतींचा काल आपली वाटचाल करीत होता. अगदी रानटी अवस्थेतही प्राण्यांची प्राणिशास्त्राच्या नियमाला धरून हळूहळू सुधारणा होत होती. भारतीय वसाहती जरी रानटी अवस्थेत असल्या तरी त्यांची प्रगतावस्था चालू होती. या वसाहती सर्व उत्तर भारतात विखुरलेल्या असल्याने त्यांच्या प्रगतीमध्येही थोडाफार फरक पडत असे. काही जास्ती तर काही कमी, पण नव्या संकल्पामध्ये असत. भाषा आणि लिपी यांच्याद्वारे वसाहतीमध्ये संचलन चालू झाले असले पाहिजे. या भूतपिशाच्च्यांचा आणि चेटकांचा सर्वांमध्ये प्रसार होऊन यापेक्षा काही जास्ती शोध लागतो का या विचारात या वसा-हती असल्या पाहिजेत. त्यावेळच्या ज्ञानाप्रमाणे, पर्जन्य ही घटना कशाने होते हे कोणाला समजत नव्हते. पण पर्जन्यामुळे फायदा होतो एवढे समजू लागले होते. पाणी म्हणजे जीवनाचे

मूळ तत्त्व. ते जर नसले तर जीवनच धोक्यात येते. तेव्हा पाणी पाहिजे हे नक्की. पण पर्जन्याच्या अवकृपेमुळे कधी कधी फार कठीण प्रसंग वसाहतीवर येत. मोठ्या प्रमाणावर जर ही अवकृपा झाली तर त्यावर काय उपाय करावा हे कोणाला समजत नसे. त्यामुळे हताश झालेले मानवसमुदाय एकुंडीला येत असले पाहिजेत. अशा अडचणींच्या मानसिक अवस्थेत माणूस कोणाकडून तरी दयेची अपेक्षा करीत असतो. मग ही दया कोणाकडे मागायची ? त्यास काही मूर्त स्वरूप पाहिजे होते. चित्रकला प्रचलित झाली होती, तिच्या आधारावर चित्र काढून त्या चित्रांची आराधना प्राथमिक अवस्थेतील भारतीय मानव करू लागले. पाऊस पडला तर पडला, नाही तर नाही. पण निदान मनाला तरी समाधान ! अशा प्रकारे मूर्ती आणि आराधना करण्याच्या प्रगतीपर्यंत मानव आले. भुतां-खेताच्या कल्पनेपेक्षा ही थोडी पुढची पायरी होती. एक भीतीपोटची तर दुसरी अपेक्षेच्या स्तरातली होती.

दीर्घ काल चालू असलेल्या गूढवादातून भारतीय समुदाय कल्पनेच्या दुसऱ्या टप्प्यात चालले होते. आता भुता-खेताऐवजी पर्जन्यदेवता, वायुदेवता, अग्निदेवता यांचा काल आला होता. त्यांत यज्ञ, कर्मकांड करून आपल्यावर अंमल चालविणाऱ्या निसर्गातल्या पंचमहाभूतांना प्रसन्न करून घ्यायचे हा हेतू होता. या कालखंडामध्ये भारतीय ग्रामसंस्थाही प्राथमिक सामाजिक अवस्थेत येत असली पाहिजे. बरेच संस्कृत भाषेतील लेखन प्रसृत होऊ लागले होते. त्यात मानवी समाज कसा असावा याचा विचार होऊ लागला होता. गूढवादातून समाज प्रत्यक्ष जीवनाच्या विचाराकडे वळू लागला होता. भारतीय संस्कृतीचा प्रभावी काल म्हणून समजला जाणारा वेदकाल सुरू होत होता. या कालात श्रुती, स्मृती, वेद, पुराणे आणि इतर अनेक प्रकारची तत्त्वज्ञाने प्रसृत होत होती. त्यांत एकसूत्रता नसली तरी काही काही कल्पनांचे साम्य होते. सर्व शक्तींवर प्रभाव पाडणारा एक ईश्वर आहे ही कल्पना अधिक मान्य होऊ लागली होती.

८ परमेश्वर, सर्वसाक्षी परमेश्वर या भूतमात्राचा निर्माता, सर्वज्ञ,

सर्वशक्तिमान असे जे काही आहे किंवा असेल ते मान्य केले पाहिजे, हा विचार मूळ धरत होता. अनन्यभावे या शक्तीला शरण जाणे हे एक कर्तव्य समजण्यात येऊ लागले होते. ही सर्वव्यापी शक्ती, अज्ञजनांच्या लक्षांत येण्यासाठी त्या शक्तीला कसले प्रत्यक्ष रूप द्यावे याबद्दल मात्र एकमत होत नव्हते. सर्वगुणसंपन्न पण निराकारी ईश्वर कल्पनेला मूर्तरूप कसे द्यावे याबद्दल बराच वाद निघाला. भिन्न मते पडू लागली. सर्वांचे मिळून एक चिन्ह असावे असे मत पडेना. अनेकांना अनेक स्वरूपांत या शक्तीची कल्पना सुचू लागली. एकच ईश्वर असावा का अनेक असावेत यावरून वादंग माजू लागले. साध्या दगडाला शेंदूर फासून गरीब माणसाची गरज भागविण्यापासून तो अनेक कला-कुसरींनी भरलेला असा देव का नसावा यावरून भांडणे होऊ लागली. देवाला माणसाचेच रूप द्यावे का जनावराचे रूप दिले तरी चालेल, याबद्दल विवेचन होऊ लागले. यावरून प्राथमिक अवस्थेतही या ईश्वरी कल्पनेला किती फाटे फुटू लागले होते याची कल्पना येईल. त्याचप्रमाणे भारतीय शिकवणूक प्राचीन कालापासून किती लवचिक होती याची कल्पना येईल. कोणताही पंथ, विचार, आचार आग्रही नव्हता. ज्याला जसे वाटेल तसा त्याने विचार करावा, वागावे अगर प्रचार करावा असे संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य होते.

९ देवाची कल्पना मानवाने शोधून काढली येथवर वाटचाल झाल्यावर पुढच्या मार्गाचीही बोलणी विचाराधीन व्हावीत हे ओघाने येते. देव शोधून काढला पण पुढे काय? त्याचे काय करायचे? तो सर्वरूप आहे, सर्वज्ञ आहे वगैरे सर्व धरून चालले तरी त्याचा उपयोग काय? काही तरी त्याचा उपयोग झाला तर बरे. उगीचच आपले देव ही कल्पना घेऊन देव देव करीत बसायला माणसे तयार नव्हती. आणि माणसे म्हणजे सगळीच चांगली असतात असे धरून चालता येत नाही. एकदा जमावात शिरल्यावर सर्व चांगले आहेत असे मानणे सयुक्तिक होत नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती. तेव्हा देवाची कल्पना व्यक्तींच्या तावडीत सापडल्यावर त्या कल्पनेला जे चैतन्य आले ते अपूर्वच म्हणावे लागेल. देव आहे, तो आम्ही मानतो,

पण त्यास असे मोकळे सोडण्यास माणसे तयार होत नव्हती. त्या कल्पनेला स्वस्थही बसू देत नव्हती. तेव्हा या कल्पनेचे काय करावे याचा विचार चालू झाला. त्यास कारणेही तशीच होती. प्रथमावस्थेतील आर्य म्हणत होते की देव म्हणजे सर्वशक्तिमान हे मानले तरी आम्ही मानव एकमेकांत भांडत असतो याचे काय? एकमेकांचे पशुधन पळवतो, आम्ही एकमेकांची लुटालूट करतो, संघर्ष निर्माण करतो, चोऱ्या करतो, खोटे बोलतो, हत्या करतो, या सर्वांमुळे जीवनास शाश्वती राहात नाही. तेव्हा देव या कल्पनेप्रमाणेच आणखी एक कल्पना काढून वागणुकीसाठी एक नियमांचे सूत्र ठरवू. त्या सूत्राप्रमाणे सर्वांनी वागावे असा प्रयत्न करू. हेच धर्म या संस्थेचे मूळ असावे असे वाटते. देवाला मोकळे सोडण्यापेक्षा त्याला जर धर्माच्या चौकटीत अडकवता आले तर मग बरेच काही सोईचे होईल असा कयास मानवातल्या धोरणी मंडळींनी काढला. देव चांगला तसा धर्मही चांगला. देवासाठी धर्म आणि धर्मासाठी देव अशी सांगड जुळली, तर मानवाचे मान्यतेस अडचण पडत नाही. हळूहळू ती रूढ होते. एक सर्वशक्तिमान देव आणि त्याचे सहाय्यास पाहिजे तसा वळविता येणारा धर्म यांची युती झाल्यास बरे असते. अशा रीतीने देवापाठोपाठ धर्माची स्थापना होऊन वेदकालीन आर्यावर्त कालक्रमणा करू लागला.

१० या कालखंडाचे वर्णन गुंतागुंतीचे होणार आहे. प्राचीन भारतवासी मानवांनी आपल्या उपयोगासाठी जी देवाची आणि धर्माची कल्पना काढली ती प्रारंभीच्या कालात अगदी साधीसुधी आणि सुटसुटीत असली पाहिजे. सर्वांनी आचरणात आणता येण्यासारखी प्रथा साधीच असावी लागते. ही देवाधर्माची कल्पना मानवाला उपयुक्तही ठरली असावी. अशा या उपयुक्त परिक्रमाना बहुतेकांचा पाठिंबा आणि मान्यताही मिळत गेली असावी. अशा रीतीने आपण काही नवी घडी समाजात बसवत आहोत याचे समाधानही त्यावेळी सर्वत्र झाले असले पाहिजे.

११ मानवी उत्क्रांती म्हणजे बदल. ती प्रारंभापासून चालू आहे. भारतापुरते पाहायचे तर असे दिसते की ही क्रिया भारतातही जोराने चालू होती. देव-धर्म प्रधान मानवी भारतीय समाज कालक्रमणा करीत असता या देव-धर्म कल्पनेला अनेक वळणे आली. निरनिराळी स्वरूपे आली. त्या सर्वांचे विवेचन करावयाचे तर एक निराळाच विषय होईल. प्रस्तुत विवेचनामध्ये जरूर असलेल्या विषयांच्या सूत्राकडे अवधान ठेवून काही अनुक्रमानेच विषयाची मांडणी करावी लागेल. मांडणी करताना शक्य तितक्या प्रयत्नाने ती शास्त्रीय आधारावर करावी अशी खटपट वैचारिक प्रवाहात कटाक्षाने केली जाईल.

१२ भारतीय संस्कृती ही कल्पनांच्या अनेकत्वावर आधारलेली आहे. यज्ञयाग, व्रतवैकल्ये, श्राद्धपक्ष, मंत्रतंत्र, कर्मकांड अशा अनेक कल्पनांवर ती आधारलेली आहे. या सर्व कल्पनाच ! पण त्या कल्पना इतक्या आत्मविश्वासाने मांडल्या गेल्या आहेत, खात्रीपूर्वक मांडल्या गेल्या आहेत की त्या पाहून माणूस थक्क होऊन जातो.

१३ त्यांतली एकच कल्पना उदाहरणादाखल विचारासाठी घेतली तरी बरेच काही दृष्टोत्पत्तीस येते. उदाहरणच घेऊ पुनर्जन्माचे. ही पुनर्जन्माची कल्पना म्हणजे काय भानगड आहे ते सांगणे मोठे कठीण आहे. ज्या कल्पनेला काही पाया नाही तिची उपपत्ती कशी लावायची ? पण इतर अनेक निराधार कल्पनांप्रमाणे पुनर्जन्म ही कल्पना समाजधुरीणांनी राबवायची ठरविली. तीही इतक्या आत्मविश्वासाने की त्या विरुद्ध ब्र काढण्याचीही छाती कोणास झाली नाही. यावरून काय दिसून येते ? पहिली गोष्ट अशी की वाटेल ती कल्पना समाजामध्ये रूढ करण्यास– बेदरकारपणे रूढ करण्यास– धर्माच्या नावाखाली माणसे तयार झाली होती. धर्म ही संस्था जाणून बुजून समाजामध्ये अपप्रवृत्तींचा प्रचार करण्यासाठी वापरली जात होती. आणि दुसरी गोष्ट अशी की त्या कालचा समाज इतका अप्रबुद्ध, चेतनाशून्य, भावडा, ईर्ष्याहीन , विचारहीन होता की त्याला पाहिजे तसा वेडावाकडा आकार, धूर्त मार्तंडांना देता येत

होता. आणि हे प्रकार संस्कृतीच्या आरंभ-कालातच रूढ होत होते.

१४ पुनर्जन्म म्हणजे काय? माणूस मरते, पण ते पूर्ण मरत नाही! त्याचा एक भाग न मरता तसाच राहातो त्याला आत्मा असे म्हणतात. मरणानंतर तो भाग शरीराला सोडतो, हवेत जातो. तेथे फिरतो. फिरत फिरत तो दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. ते शरीर मेले तर तिसऱ्यात जातो. असा तो अनेक शरीरांत जातच राहातो. अशाप्रकारे ज्या अनेक शरीरांत आत्मा जातो ते माणसाचे पुनर्जन्म. असे अनेक पुनर्जन्म घेत आत्मा घुटमळत असतो. जिवंतपणी केलेल्या पाप-पुण्याच्या हिशोबात निरनिराळ्या जन्मांचे वाटप होते. अशी आहे पुनर्जन्माची कहाणी. कल्पनेचा असा कडेलोट कोणी केला नसेल. ज्यांच्या कल्पनाशक्तीतून ही कल्पना निघाली असेल त्यांची कल्पनाशक्ती किती अमर्याद असली पाहिजे याची कल्पनाही करता येत नाही. आणि अशी ही अमर्याद कल्पना ज्या समाजांनी बिनतक्रार मान्य केली त्यांच्या मूढ मतीचीही कल्पना करता येत नाही.

१५ पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, इहलोक-परलोक, मोक्ष हे तर भारतीय शिकवणुकीचे आधारस्तंभ. त्यात अवतार घेऊन खुद्द ईश्वरच जेव्हा मानवांत प्रगट होतो तेव्हा त्याचे वर्णन करणे अवघड जाते. कोणी असे विचारील की काय हो असे हे अघटित प्रकार मानवाने निमूटपणे कसे मान्य केले? आम्हाला तरी हे काही पटत नाही– असे भलतेच आम्हाला काही सांगू नका– शिकवू नका– आम्हाला ते मान्य होण्यासारखे नाही, वगैरे तक्रार कोणीच कशी केली नाही? केली, पण तिचा उपयोग झाला नाही. ज्यावेळी आत्मा, परलोक, देव आणि अवताराच्या गोष्टी धूर्त माणसे समाजात पसरवू लागली त्या वेळी त्यांच्याच समोर बसून अनेकांनी स्वच्छ सांगितले की हे जे पारलौकिक तत्त्व आम्हाला सांगण्यात येत आहे ह्यावर आमचा अजिबात विश्वास नाही. भलतेच खोटे-नाटे, बनावट, अर्थशून्य असे तुम्ही काही बडबडत आहात आणि करत आहात. हे आम्ही

मुळीच मान्य करणार नाही.

१६ परिणाम एवढाच झाला की जे लोक असे नास्तिक विचार प्रगट करत होते त्यांचाच काटा आध्यात्मिक वाद्यांनी काढला. त्यांचे लेखन नाहीसे केले. ते होते की नव्हते येथवर त्यांचा निकाल लावून टाकला. धर्मकारण म्हणजे सर्व संत कारण, आणि थोरपण नसते, तर त्यात मोठा भाग गुंडशाहीचा असतो. धाकदपटशा, बळजबरी, जुलूम, मारहाण, संघर्ष, युद्धे, राजकारण यांनीच सर्व धर्म कारणे भरली आहेत. धर्मप्रचार हे एक प्रकारचे युद्धच असते. मानवी इतिहासात धार्मिक समजुतींवरून जे अत्याचार आणि ज्या हत्या झाल्या आहेत, त्यांच्यापुढे आधुनिक युद्धातील हत्या अगदी नगण्यच मानाव्या लागतील. तेव्हा तक्रार न करता मुकाटयाने सोसण्याचा जो प्रकार रूढ झाला त्याच्या मुळाशी ही छळाची आणि बहिष्काराची भीती असावी.

१७ आद्य भारतीय संस्कृति-निर्माते हे मानसशास्त्राचेही अभ्यासक असले पाहिजेत. त्यांना समजले असले पाहिजे की माणसे भिऊन जरी स्वस्थ राहिली असली तरी अंतर्यामी ती अस्वस्थ आहेत. आपण ज्या पुनर्जन्माच्या, आत्म्याच्या, आणि पापपुण्याच्या कल्पना प्रसृत करीत आहोत त्या निमूटपणे मान्य केल्या जात नाहीत. आपल्या मागे त्याबद्दल नापसंती नाराजी दाखविली जात आहे. ही नापसंती अशीच चालू राहिली तर त्यामधून बंडखोरवृत्ती निर्माण होणे शक्य आहे. अशा बंडखोर वृत्तींना वाव मिळाला तर आपल्या सनातन धर्म विचारांना अडसर लागणार आहे. तेव्हा या नापसंतीवर आणि विरोधीवृत्तीवर काही उपाय काढला पाहिजे.

१८ विचारांती असा उपाय निघाला. मानसशास्त्राला धरून माणसाला फुरसत मिळाली की तो विचार करू लागतो. त्यानी विचार करू नये असे जर संस्कृति-मार्तंडांनी ठरवले असेल तर त्यासाठी माणसाला मोकळा वेळ मिळून उपयोगी नाही, असे काही केले पाहिजे, सदैव त्याच्या मागे काही तरी भुणभुण

लावली पाहिजे अशी भुणभुण लावण्याचे एक साधन म्हणून भारतीय कर्मकांड निर्माण करण्यात आले. एकामागून एक क्रिया निघू लागल्या. सकाळी उठल्यावर प्रातःस्मरणापासून सुरुवात होऊ लागली. प्रातःस्मरणानंतर, स्नानसंध्या, त्यानंतर यज्ञयाग, त्यानंतर तपश्चर्या, भस्मलेपन, अर्घ्यप्रदान, उपोषण, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये इ. या क्रियांना अंत नाही. कितीही कर्मकांड केले तरी ते संपत नाही, आणि त्यातून माणूस बाहेर पडत नाही. सकाळी, संध्याकाळी, रात्रीसुद्धा हे चालूच शकते. दिवसभरच नाही तर महिनाभर, वर्षभर, जन्मभर नुसते कर्मकांडच करीत राहिले तरी ते संपत नाही. अशी योजना आखण्यात आली. या कर्मकांडातही भीतीची योजना होतीच जर या कर्मकांडात काही कमी पडले, राहून गेले, अगर चुकले तर ते फार वाईट. ते भयंकर पाप. त्यावर मोठमोठी प्रायश्चित्ते, शिक्षा, दंड ! भीतीशिवाय भ्रष्टीकरण नाही, हे तत्त्व प्रखरपणे अमलात येऊ लागले होते.

१९ आधुनिक विसाव्या शतकात वावरणाऱ्या भारतीयांपुढे मांडायचा एक मोठा विचार असा की या कर्मकांडामागे एक मोठी घटना भारतीय समाजावर लादली जात होती. ती म्हणजे विचारापासून परावृत्ती ! विचार नको. समाजाला विचार करायला लावू नका— शिकवू नका. त्यापासून धोका आहे. हे महाभयंकर धोरण भारतीय संस्कृतीच्या निर्मात्यांनी इतक्या कटाक्षाने पाळले आहे की त्याचे आश्चर्य वाटते. कोठेही काही प्रश्न निर्माण झाला की तो आम्ही सोडवतो. तुम्ही सोडवू नका, त्यावर विचारही करू नका. तुमच्यासाठी सर्व विचार आम्ही करतो आणि आम्हाला जर करता आला नाही तर देव करील, पण माणसा तू विचार करू नकोस ‘ ठेविले अनंते तैसेचि रहावे . . ’ ‘ शिक्षा देव तयाला करिल म्हणोनी उगीच बैसावे ’ अशी आहे ही घातकी शिकवण. या एका शिकवणुकीमध्ये भारतीय अधोगतीचे बीज आहे. बुद्धिवादावर योग्य वेळी विवेचन होणारच आहे. तूर्त कर्मकांडावर आधारलेल्या समाजावर आणखी कसली दडपणे ठेवण्याचे घाटत होते त्याचा विचार करू.

२० समाजावर एकामागून एक बंधने घालण्यात येत असलेल्या कालाचे वर्णन करण्यात येत आहे. ही बंधने बऱ्याच ठिकाणी निमूटपणे मान्य होत होती तर काही ठिकाणी त्यांना तीव्र विरोध होत होता याचाही निर्देश करण्यात आला आहे. ज्या वेळी विरोधाची पातळी वाढू लागली त्यावेळी मानसशास्त्राचा अभ्यास केलेल्या पुरोहितांनी पाहिले की विरोध फार होऊ लागला आहे आणि माणसे नाराज होत आहेत. यावर काही उपाय योजणे जरूर आहे. आता काही हलके फुलके काढले पाहिजे. ज्यामध्ये माणसे रमतील, त्यांची करमणूक होईल असे काही काढले पाहिजे. भारतीय संस्कृती म्हणजे एक भला मोठा किल्ला आहे, दुर्ग आहे. बाहेरच्यांनी येऊन आत गोंधळ माजवू नये म्हणून किल्ल्यामध्ये जसे एकामागे एक तट बांधलेले असतात तशा या संस्कृतीच्या बांधणीत अनेक तटबंद्या आहेत. एक ओलांडली की दुसरी. यां मधून हा किल्ला सुरक्षित ठेवण्यात आला आहे. या तटबंदीच्या मागे समाजावर हल्ला करण्याची शस्त्रे ठेवलेली आहेत. तूर्त ज्या शस्त्राबद्दल सांगायचे ते शस्त्र जबरदस्त होते. त्या शस्त्राने भारतीय संस्कृतीत फार मोठी कामगिरी बजावली आहे. रूपकाचे पूर्णतेसाठी या शस्त्राला आपण भारतीय "कथा पुराण" शस्त्र असे नाव देऊ.

२१ आपल्या अनुयायांसाठी करमणुकीची साधने ही सर्व धर्मांना पुरवावीच लागतात. आपापल्या वृत्तीप्रमाणे ही साधने निराळ्या प्रकारची असतात. कोणी नाचरंग तमाशाची धमाल उडवून देतात, तर कोणी क्रूर करमणुकीची व्यवस्था करतात. पण या करमणुकीच्या योजनेमध्ये बऱ्याच धर्मांनी रस घेतला नाही. तोटकी, लहान, प्रहसने, प्रसंग, चमत्कार येवढ्यावर बरेच-जणांची प्रज्ञा थांबली. भारतीयांनी मात्र कथा, कीर्तने आणि पुराणे यांचा नुसता पाऊस पाडला. इतक्या प्रचंड संख्येने कथानके रचण्याची करामत इतरांना साधली नाही. या कथानकांमध्ये काही महाकाव्येही निर्माण झाली. रामायण-महाभारतासारखी प्रदीर्घ कथानके क्वचितच इतर धर्मांत सापडतील. कृष्णलीला, वस्त्रहरण, कौरव-पांडव युद्ध, मारुतीच्या शेपटीपासून शंकराच्या जटेपर्यंत कथानकेच कथानके! असा एक संसारात प्रसंग येत

नाही की ज्यावर आधारित काही कथा नाही! जगात जे सापडणार नाही ते भारतीय कथा-कीर्तनात सापडते. अरेबियन नाइट्स हा कथासंग्रह भारतीय कीर्तनाच्या पासंगासही लागणार नाही. कोणी असे विचारील की या कथा-कीर्तनांना शस्त्र का म्हणायचे? उत्तर असे आहे की या सर्व गोष्टींमागे एकच हेतू आहे. तो म्हणजे माणसाच्या अंधश्रद्धेला खतपाणी पुरवणे हा होय. असंभाव्य, अशक्य, अनाकलनीय अशा घटना समाजाच्या गळी उतरवून समाज भाबडा, अंधश्रद्ध आणि बेसावध करणे हे काम पुराणांनी चांगले केले. ज्या प्रकारचा भारतीय समाज होण्याच्या मार्गावर होता त्याला ही कथानके सहाय्यभूत होत होती. रामायण महाभारताना गोष्टी म्हणून संबोधिण्याचा उद्धटपणा कोणी केला तर अनेकांना राग येईल. ही कथानके म्हणजे सत्य कथने. प्रत्यक्ष झालेल्या गोष्टींची निवेदने आहेत असे मानण्याइतकी अनेकांची मनोधारणा झाली आहे. यावर स्पष्टीकरणाच्या दृष्टीने एकच प्रगटन केले तरी पुरे आहे. तर्कशास्त्राच्या आधाराने पाहाता एखादी घटना घडली हे सत्य सिद्ध करण्यासाठी पुरावा द्यावा लागतो. हजारो गोष्टी, चमत्कृतिप्रधान असलेल्या, खऱ्या आहेत असा जर कोणी दावा मांडील तर तो कसा टिकणार?

२२ भारतीय संस्कृतीच्या धावत्या अवलोकनात एकामागून एक अशा घटना दिसून येतात की त्यामुळे समाज जास्त जास्तच अगतिक होऊ लागला होता. एकदा समाजावरती प्रभुत्व गाजवण्याची ईर्ष्या मनात उत्पन्न झाली की काय वाटेल त्या उपायांनी ती सिद्धीस नेण्याची तयारी धूर्त मानवी गटात उत्पन्न होते. स्वार्थ कुणाला सुटला आहे? मात्र कुठल्याही धूर्त गटाला एक भीती सदैव सतावत असते. त्यांना माहीत असते की समाजाला आपल्या स्वार्थासाठी आपण जरी गैर मार्गाला लावत असलो तरी या अनेक लोकांतून एखादा जरी उठला आणि त्याने आपले दुष्ट हेतू आणि मार्ग याचे वाभाडे काढण्यास सुरुवात केली तर कसे? याकरिता वैचारिक बैठकीला किती होतील तितक्या युक्त्यांनी पार बुडवून टाकले पाहिजे. अशा या प्रयत्नांचे काही नमुने आतापर्यंत दाखवून झाले. त्यातील

एका मोठ्या प्रयत्नाचे दिग्दर्शन करणे जरूर आहे.

२३ मायावाद म्हणून एक अपूर्व कल्पना भारतीय पूर्वजांनी पाढली. हे प्रकरण बरेच जड आहे. त्याचे विवेचन करताना बरीच गुप्त कारस्थाने उघडकीस आणता येतील. या मायावादाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की जे माणसाला दिसते ते सर्व भासमय आहे. त्यात काहीं खरे नाही. एका माणसाला दुसरे माणूस दिसले तरी दिसणारे माणूस नाही आणि पाहाणाराही नाही. हा सर्व भास आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू हे सर्व भास आहेत. जग सर्व भासमय आहे. सर्व खोटे आहे. सर्व नश्वर आहे. काहीही अक्षय नाहीं. कशालाही खरे समजू नका. सर्वापासून अलिप्त राहा. जग ही सर्व माया आहे !

२४ समाजाच्या माथ्यावर ही कल्पना मारल्यावर त्याची जी शतकानुशतके दुर्दशा झाली आहे ती सहृदय माणसाला पाहावत नाहीं. माणूस पार भांबावून गेला. त्याला काय करावे ते समजेना. कारण, काहीही करायला गेले की पहिला विचार मनात असा येत असे की हे करून काय करायचे ? जे व्हायचे असेल ते होईल. माझ्या नशिबात जे असेल ते होईल. दैवात जे असेल ते होईल. भारताच्या पारंपरिक, पौराणिक आणि— परमावधीच्या दारिद्र्याचा या मायावादाने आणि दैववादाने पाया घातला हे आधुनिक भारतीयांनी ध्यानात घ्यावे. या मायेने आणि दैववादाने प्रयत्नवाद पार रसा तळाला नेऊन पोचविला.

२५ या मायेच्यामागे भक्तिमार्ग आला. मायेने भांबावलेला समाज भक्तिमार्गाचा स्वीकार करण्याच्या मानसिक अवस्थेत सहज आणता आला. या भक्तीचे स्तोम इतके माजवले गेले की भक्तीखेरीज दुसरे काही न दिसण्यापर्यंत समाज गेला. एक भक्ती केली की माणसाला दुसरी कसलीही अडचण राहात नाहीं. जे बुद्धीने साधत नाहीं ते भक्तीने साधते. माणसाने वाटेल तितकी पापे करावी पण शेवटी जर भक्तीने देवाचे नाव घेतले तर सर्व पापे धुऊन जातात ! देवाजवळ जर काहीं न करता जवळच्या रस्त्याने जायचे असेल तर एक भक्तीने जाता येते. माणसाजवळ

काही नसले आणि फक्त भक्ती असली तरी तो भवसागर तरून जातो! जो भक्ती करतो त्याच्या पालनपोषणाची आणि संरक्षणाची हमी परमेश्वर घेतो. सर्व समाज या भक्तीच्या पायात धुंद झाला तर त्यासारखी उच्च अवस्था दुसरी नाही! अशा समाजाचा त्राता परमेश्वर असतो. जन्माला येऊन सर्वात मोठे कर्तव्य कोणचे असेल तर ते भक्तिपूर्ण जीवन. मोठमोठे ग्रंथ लिहून भारतीय पूर्वजांनी काय मिळविले तर भक्तीचे माहात्म्य समाजाला पटवून दिले. एखादे वेळेला पटले नसले तरी निदान पसरून दिले. भक्तिमार्गाचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्याचा सोपेपणा. त्याला काही विशेष लागत नाही. सर्वसाधारण माणसासही भक्तियोगाच्या सोपानमार्गाने थेट मोक्षापर्यंत जाता येते. वेडे, खुळे, मूर्ख या सर्वांना भक्तिमार्गाची दारे सताड उघडी ठेवलेली आहेत. भक्तिमार्ग हा समाजातील वेगवेगळ्या स्तरांना एका पातळीवर आणतो. त्यामुळे तो समभाव निर्माण करतो! भक्तीमुळे मनातील शंका नाहीशा होतात. मन स्थिर होते. भक्तियोगाची समाधि–अवस्था गाठल्यास प्रत्यक्ष परमेश्वर समक्ष येऊन उभा राहातो. भक्ति-मार्ग समजून सांगण्यास सोपा, आचरण्यास सोपा आणि त्वरित फलदायी असा आहे. असे हे साधन समाजाच्या गळी उतरवताना धर्ममार्तंडांनी दाखवलेली हुशारी, धूर्तपणा, कावेबाजी, मनाला थक्क करून सोडते.

२६ प्रगतीच्या आणि प्रबोधनाच्या मार्गावर अनेक अडथळे मांडून ठेवण्याचा पद्धतशीर उद्योग भारतीय संस्कृति–निर्मात्यांनी केला आहे हे सिद्ध करण्याचा हा प्रयत्न मुद्दाम करण्यात येत आहे. कोणच्याही विवाद्य विषयाच्या दोन्ही बाजू समजावून घेणे हे अभ्यासूंच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्या दृष्टीने आतापर्यंत विषयाची मांडणी केली. या सर्व मांडणीमध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा अद्यापि मांडलेला नाही. त्याचा विचार होणे आवश्यक आहे. आतापर्यंतच्या विवेचनात पुनःपुन्हा दाखविण्यात येत असलेल्या सूत्रांमध्ये एक सूत्र सर्वत्र गोवलेले दिसते ते म्हणजे समाजाला भाबडे बनविण्याचे प्रयत्न. या नाही त्या निमित्ताने समाजाला विचार करू द्यायचा नाही. बुद्धिमार्गाकडे जाऊ द्यायचे नाही,

हा तो प्रयत्न. अनेक विकृती निर्माण करण्याचे प्रयत्न चालू असता एक कल्पना निघाली. तिच्यापुढे इतर सर्व कल्पना फिक्या पडल्या.

२७ ही कल्पना अशी की ज्यांच्यावर संस्कृतीचे प्रहार करण्यात येत आहेत त्यांना एक होऊ द्यायचे नाही. त्यांच्यात ऐक्यभावना कधीही निर्माण होऊ द्यायची नाही. समजा, काही योगायोगाने ते एक झाले, त्यांच्यात ऐक्य निर्माण झाले आणि ते सर्व एक होऊन आपल्यावर उठले; तर कसे करायचे ? धूर्त मनात असा विचार येणे शक्य आहे. नुसते शक्य नाही तर प्रत्यक्षात तसे झाले तर काय करावे याचाही विचार करून ठेवणे बरे असे त्यांना वाटले असावे. त्याकरिता असे होऊ नये म्हणून सर्व समाजात भांडण-तंटे अखंड चालू ठेवण्याचा उपक्रम का करू नये? समाजाची चिरफाड का करू नये ? समाजाचे अनेक तुकडे का करू नयेत ? अशा रीतीने समाजाचे तुकडे तुकडे करून चातुर्वर्ण्याची कल्पना समाजात का घुसडून देऊ नये ? अशी ती महाघातकी कल्पना होती. चातुर्वर्ण्य म्हणजे चार तुकडे. सुरुवात चार तुकड्यांनी झाली. या चाराचे चारशे आणि चार हजार होण्यास वेळ लागला नाही. वर्ण झाले, गोत्र झाले, जाती झाल्या, उपजाती झाल्या, भारतीय जनता हजारो तुकड्यांत विभागली गेली. आपण सर्व एक आहोत या कल्पनेस कायमची मूठमाती मिळाली. कोणताही विचार अगर आचार करावयाचा असेल तर आधी तो या हजारो जातींच्या तुकड्यांत मांडावा लागतो. कोण ही भयंकर अडचण, आणि ती किती खोलवर रुजवली गेली आहे ! या अडचणीतून मार्ग काढणे जवळजवळ अशक्य झाले आहे. माणसे, गटात वाटून गेली. त्यांच्यापासून भीती कमी झाली. लहान लहान गटांत वावरण्याची समाजास सवयच झाली. कोणाच्या मनातही मोठ्या एकीच्या कल्पना येईनात. या लहान गटात वैयक्तिक विचार जास्ती प्रभावी होऊ लागले. मी आणि माझे ' या पलीकडे विचार जाईनात. मी एकटा भक्ती करीन, मी एकटा मोक्षाला जाईन, मी जन्म-मरणाचे फेरे चुकवीन. माझ्या एकट्याच्या पाप-पुण्याचा हिशोब चित्रगुप्ताने निराळा ठेवावा,

या व्यक्तिगत आकांक्षेचा, म्हणजेच दुसऱ्या शब्दांत स्वार्थाचा प्रभाव भारतीय संस्कृतीवर इतका पडला की विद्वान पंडितही भारतीय धर्म हा वैयक्तिक धर्म आहे असे म्हणू लागले. माणसांना वेगळे पाडून त्यांना स्वार्थांध करण्याचे काम या चातुर्वर्ण्याने केले.

२८ प्राचीन भारतीय समाजाचे ओझरते दर्शन थोड्या जागेत देण्याचा हा प्रयत्न आहे. कोणकोणत्या दबावाखालून समाज जात होता याची अंधुक कल्पना येवढ्या विवेचनावरून यावी. प्रथम हतबल अवस्थेत ईश्वराची कल्पना निघाली. नंतर नियंत्रणासाठी धर्माची आवश्यकता भासली, नंतर दहशत बसवण्यासाठी पुनर्जन्माची कल्पना निघाली, त्या नंतर हवेमध्ये आत्मा सोडण्यात आला, मग परलोकात फिरवून आणण्याची क्लृप्ती निघाली, त्यानंतर पाप-पुण्याची बंधने निघाली, कर्मकांडाचे मोहोळ उठवण्यात आले, मग गप्पा, गोष्टी, कथा-पुराणे या स्वप्निल जगात गोठून टाकण्यात आले. मग मायावादाने सर्वत्र अंधार करण्यात आला, नंतर भक्तियोगाचे टाळ हातात देण्यात आले आणि शेवटी तुकडे करून चातुर्वर्ण्यांत टाकण्यात आले ! भारतवासीयांचा असा एक मातीचा गोळा तयार करून आद्य संस्कृतिकारांनी तो पृथ्वीवरील या त्रिकोणी भूभागात हलकेच अवकाशात सोडून दिला— जा, बाबा, जा. तुला कुठे जायचे ते जा. आम्ही तर आम्हाला पाहिजे तसा तुला बनवला. यानंतर तुझे नशीब तुझ्या बरोबर. तुझे काय होईल ते पाहायचे आमचे काम नाही, ते तुझे तू पाहा. आमच्यावर काही जबाबदारी नाही असे म्हणून भारतीय संस्कृती गुप्त झाली. सर्व भारतीय संस्कृतीने कुणाला न समजू देता, कुणाला पत्ता न लागू देता फक्त एकच काम केले. बुद्धिवादाचा स्पर्शही भारतीय संस्कृतीला होऊ दिला नाही.

२९ (भारताच्या पौराणिक इतिहासात असा एक कालखंड येऊन गेला की त्यावेळी काही नवे लिहिले जात नव्हते. आधारभूत, श्रुती, स्मृती, वेद, पुराणे लिहून झाल्यावर इतर दुसरे काही लिहिणे बंदच पडले. ज्यावर अवलंबून राहायचे ते त्या वेळच्या

एकोणिस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६८८
क्र. ३६०७
दि.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

कल्पनेप्रमाणे लिहून झाले होते. राहिले होते ते फक्त आचरण्याचे. समाजाचा चौकट आखून झाली आहे, त्याप्रमाणे वागावे येवढाच संदेश होता. तो कटाक्षाने राबवण्यात आला. थोडाही भंग कोठे होत नव्हता. भारतीय वैदिक संस्कृती समाजात पूर्णपणे रुजण्यास भरपूर अवधी मिळाला. कालक्रमाने ही संस्कृती इतकी भक्कमपणे रुजली की तिला एखाद्या प्रचंड दगडी शिळेचे रूप आले. बाहेरील घटनांचा त्या शिळेवर कसलाही परिणाम होईना. ती बदलणे तर बहुतांशी अशक्य झाले. बरे वाईट जे काही आहे ते या संस्कृतीच्या अंगभूतच आहे. जे या संस्कृतीने शिकविले, जे संस्कार केले, जो मार्ग दाखविला तो रोमरोमात इतका भिनला की या संस्कृतीशिवाय दुसरे काहीच या भरतभूमीत रुजेना. ऐतखाऊपण,ऐदीपण, स्वार्थ, भाबडेपण, कसलीही ईर्ष्या नाही, महत्त्वाकांक्षा नाही, कर्तबगारी नाही, गरिबीची लाज नाही, अपमानाची शरम नाही अशा शिकवणीतून यापेक्षा दुसरे काय होणे शक्य होते ? या लिहिण्याचा एखाद्याला राग येईल. पण आपला इतिहास पाहता या सर्व अवगुणांचा प्रत्यय आपल्या प्रत्यक्ष जीवनात येतो, तिकडे आता आपण वळू.

३० आर्यावर्त, भारत ही नावे मागे पडून भारतीय संस्कृतीला हिंदू संस्कृती असे म्हणण्यात येऊ लागले. तसेच धर्माचे नावही हिंदू धर्म असे झाले. ही घटना इसवी सनापूर्वी हजार वर्षे झाली असावी. हिंदुस्थान, हिंदू संस्कृती, हिंदूधर्म या गोष्टी सुरुवात होऊन आता तीन हजार वर्षे होत आली असावीत. वैदिक काल संपला, मध्यंतरी काही अंधुक काल गेला— ज्यामध्ये भारतीय संस्कृती ही दगडी शिळेप्रमाणे घनिष्ठ झाली आणि त्यानंतर हा हिंदुस्थानचा हिंदू संस्कृतीचा काल सुरू झाला. या कालातील सामाजिक प्रगल्भता लक्षात येण्यास एका घटनेचा फार उपयोग होतो. राजा आणि प्रजा अशा संबंधामध्ये माणसांची वाटणी झाली. हे राजे लोक आपल्या भोवतीचा मुलूख शस्त्रबळाने आणि सैन्याचे मदतीने जिंकीत. त्यावर आपले प्रभुत्व स्थापन करीत आणि मिळणाऱ्या खंडणीवर आणि लुटून आणलेल्या साधनसामग्रीवर आणि संपत्तीवर आपला जीवनक्रम

चालवीत. असे लहानमोठे अनेक राजे होते. सर्व हिंदुस्थानभर ते विखुरले होते. या राजांमध्ये जे जास्ती बलदंड निघत ते अशा अनेक लहान लहान राजांना आपल्या हुकमतीखाली आणून स्वतःला सम्राट असे म्हणवून घेत. अशी सम्राट घराणी अनेक निघाली. सातवाहनापासून चालुक्य घराण्यापर्यंत अनेक घराण्यांनी हिंदुस्थानभर दोनशे ते चारशे वर्षांपर्यंत आपली सत्ता गाजवली. हा सर्व हिंदू धर्माचा, हिंदू संस्कृतीचा आणि हिंदू सम्राटांचा उर्जित काल असे समजण्यात येते. वेदकालाचीच संस्कृती या कालात प्रचलित होती. राजा आणि प्रजा हे संबंध नवे असले तरी रूढ झाले होते. त्यामध्ये वाटणी झाली होती. राजाने राजकारण करायचे, लढाया करायच्या खंडणी वसूल करायची, संपत्ती जमवायची. हे सर्व करण्यासाठी ज्यांचे सहाय्य लागायचे असे प्रधान, सेनापती, सरदार, न्यायनिवाडा देणारे, हिशोब ठेवणारी माणसे आपल्या भोवती ठेवायची आणि राज्य करायचे. त्यांच्याच बाजूला प्रजा म्हणून एक मोठी सृष्टी वावरत असायची. ती राजांच्या आश्रित अधिकाऱ्यांच्या आसमंतात राहायची. त्यांचे काम, शेती, उद्योगधंदा करणे असे होते. राजाला सर्व अधिकार असत, जबाबदाऱ्याही असत. प्रजेला मात्र कसलेही अधिकार नसत. त्यामुळे जबाबदाऱ्यांचा प्रश्न उद्भवत नसे. राजाने मन मानेल तसे राज्य करावे आणि प्रजेने निमूटपणे जे होईल ते सोसावे. लूटमार, दंगा धोपा, अत्याचार झाले तर ते निवारण्यात आपल्याला काही करावे लागेल अगर करता येईल हा विचार प्रजेने कधीही करायचा नाही असा अलिखित लोकाचार होता. त्यामुळे प्रजाही राज्य कारभाराबद्दल उदासीन असे. राज्य कुणाचे, काय, कसे, हा विचार प्रजेस करावा लागत नसे. कोणी का राजा असेना, आपल्याला काय त्याचे? आपण बोलून चालून प्रजा! आपल्याला कसलेच हक्क नाहीत. स्वस्थ बसायचे आणि जे होईल ते पाहायचे.

३१ अशी ही राजा-प्रजांची समाज व्यवस्था सुरळीत चालत होती. या सम्राटांचा लौकिक दूरवर पसरलेला असे. त्यांचे ऐश्वर्य डोळे दिपवणारे असे. हत्ती, घोडे, राजवाडे, बाग-बगीचे, शहरे,

अफाट सैन्ये, गडगंज सोने-नाणे याची त्यांना ददात नसे. ते संपन्न असून आपल्या स्थानी पक्के रुजले होते. कुणाचीही भीती या सम्राटांना वाटत नसे. आणि असे सम्राट अनेक होते. ही संस्कृती दीर्घकाल टिकून यथावकाश त्यांच्यात सुधारणा होत एखादी प्रगल्भ अशी समाजरचना तयार होण्यास काही हरकत नव्हती. पण नियती निराळी होती. याच विवेचनात मागील भागात पश्चिमेकडून येणाऱ्या रानटी टोळ्यांचा उल्लेख आला आहे. त्याच प्रकारची पुनरावृत्ती झाली. धनाच्या लोभाने आणि लुटीच्या आशेने मुसलमान लोकांनी हिंदुस्थानवर हल्ले करण्यास सुरुवात केली. या हल्लेखोरांचा धर्म, भाषा, संस्कृती अगदी वेगळी होती. वृत्तीने ते चढाईखोर आणि क्रूर होते. त्यांच्या रोमरोमात साहस भरले होते. एकीची जाणीव त्यांच्यात होती. महत्त्वाकांक्षा तर अपार होती. दिग्विजय करीत स्वतःच्या घरादारापासून दूरदूर पल्ले मारीत त्यांनीही अमाप संपत्ती गोळा करण्यास आरंभ केला होता. यथावकाश या मुसलमान सुलतानांचे लक्ष हिंदू सम्राटांच्या राज्यांवर गेले. हे हिंदू सम्राटही काही कमी नव्हते त्यांची शक्तीही मोठी होती. जेव्हा या बादशहांची आणि सम्राटांची जुंपली तेव्हा मोठाच युद्धाचा डोंब उठणार असे कुणालाही वाटले असते पण दुर्दैव असे की असे फारसे मोठ्या प्रमाणावर काही झाले नाही. युद्ध प्रसंगात हिंदू सम्राट टिकेनात. त्यांचा पराभव होऊ लागला. एकामागून एक राजे पराभूत होत राहिले. त्यांचे सर्व ऐश्वर्य गेले, सैन्य गेले, राज्य गेले आणि थोड्याच कालावधीत भारतामध्ये नाव घेण्याससुद्धा हिंदू राजे राहिले नाहीत.

३२ अशी ही शोकांतिका का झाली याची कारणे इतिहासकार आणि अभ्यासू अनेक प्रकारे देतात. घटनाच तशी विचार करायला लावणारी आहे. सर्व अनुकूलता असताना स्वतःच्या घरातच पराभूत होण्याची पाळी या सम्राटांवर का आली ? त्यांना काय कमी पडले ? मुसलमानांपाशी काय जास्ती निघाले ? पराभव एखाद वेळ समजेल; पण सर्वांवर नामशेष होण्याची पाळी का यावी याचा विचार होणे आवश्यक आहे. या पराभवाची कारणमीमांसा योग्य प्रकारे व्हावयास हवी. ती करताना

निःस्पृहपणे सारासार विचारही व्हावयास पाहिजे. काहीतरी न पटणारी विधाने करून वेळ मारून नेल्यास विचारी माणसांचे समाधान होणार नाही. कोणी म्हणतील हिंदू सैन्ये बरोबर लढली नाहीत, राजे लोकांनी लक्ष दिले नाही, मुसलमान भारी ठरले, तर हे सर्व पटणार नाही. यापेक्षा या सर्वंकष पराभवाची कारणे निराळी असली पाहिजेत. पराभव मोठा तशी कारणेही मोठी असली पाहिजेत.

३३ समाजाच्या परीक्षेची वेळ येते तेव्हा त्याच्या सद्‌गुण-दुर्गुणांची प्रचीती येते. सद्‌गुणांची बेरीज अधिक झाली तर बरे असते पण दुर्गुणांची झाली तर कठीण प्रसंग येतो. भारतीय संस्कृतीचे असेच काही झाले असले पाहिजे. शेकडो वर्षांच्या अनुषंगाने जे गुणावगुण या संस्कृतीत सामील झाले होते त्या सर्वांची मिळून एक गोळाबेरीज होऊन स्थूलमानाने त्या संस्कृतीचे स्वरूप ठरले गेले होते. ते रूप उत्साहजनक नव्हते, कार्यप्रवर्तक नव्हते, त्यात भावडेपण होते, अंधश्रद्धा होती, जीवनकलहामध्ये जिवंत राहाण्यास जी जिद्द लागते ती नव्हती. प्रयत्न नव्हता, दैव होते. अध्यात्म, परलोकाकडे पाहाता पाहाता इहलोकाकडे दुर्लक्ष झाले होते. कर्मकांडात गुंतलेली माणसे विचार करण्याचे टाळत होती. असा हा सर्वतोपरी अकार्यक्षम जमाव त्यांच्यापेक्षा निराळ्या प्रवृत्तीच्या माणसापेक्षा कमी कार्यक्षम निघाला, आणि त्यांचा पराभव झाला. भारतीय संस्कृतीची निखालस कमतरता या संघर्षामुळे तीन हजार वर्षांपूर्वीच दिसून आली. या भारतीय संस्कृतीत बरीच उणीव आहे, अपप्रचार आहे, दिशाभूल आहे, विश्वास ठेवण्यास ती अयोग्य आहे, विचारांना न पटणारी आहे, इतकेच नाही तर घातुक आहे याची जाणीव व्हावी इतकी खळबळजनक अशी ही घटना होती. ज्यांच्याकडून भारतीय संस्कृतीचा पराभव झाला होता ती संस्कृतीही फार उच्च दर्जाची होती असे नाही. भारतीय संस्कृतीचे एक वेड होते तर मुसलमानी संस्कृतीचे दुसरे होते इतकाच फरक होता. या संघर्षाने आणखी एक मोठी घटना घडली. हिंदू राजांचे वेळी भारताची आर्थिक परिस्थिती थोडी बरी होती. राजे रजवाड्यांचे सोडून दिले तरी सर्वसाधारण जनतेला बरे

दिवस होते. खायला प्यायला आणि कपडालत्त्याला कमी पडत नव्हते. पण या पराभवानंतर जे दारिद्र्य आले ते फार धोक्याचे होते. जवळ होते नव्हते ते सर्व लुटले गेल्यावर जो समाज बाकी राहिला तो कसा असेल याची कल्पना केलेली बरी. आधुनिक विसाव्या शतकात वावरणाऱ्या भारतीयांच्या विचारासाठी येथे एक मुद्दा मांडावा असे वाटते. या ऐतिहासिक घटनेमुळे एक गोष्ट ध्यानात यावयास पाहिजे. संस्कृतीचा आणि आर्थिक परिस्थितीचा जवळचा संबंध असतो हे नीट ध्यानात घ्यावे. संस्कृती जर निकृष्ट दर्जाची असेल, तर आर्थिक बाजूही कमी दर्जाची असते. संस्कृती जर भोंगळ असेल तर त्यातून दरिद्री समाजच निघतो.

३४ अशी ही हिंदू साम्राज्याची कथा होऊन गेली. घटना मोठी होती. विचार करायला लावण्यासारखी होती, सर्व हिंदुस्थानभर एकदम घडून आलेली अशी होती. इतके झाल्यावर तरी माणसे जागी होऊन काय झाले याचा विचार करतील असे कोणालाही वाटावे अशी परिस्थिती होती. थोडासा जरी विचार करण्याची प्रवृत्ती असलेला समाज असता तरी त्याचे मनात काही विचार आला असता. दुर्दैव असे की असे काहीं झाले नाही. हिंदू मन स्थितप्रज्ञ झाले होते. कशात काही अर्थ नाही. आपणाला येथे काही कर्तव्य नाहीं, तेव्हा उगीच काहीं हालचाली करण्यापेक्षा निवांत बसावे. ठेविले अनंते तैसेचि रहावे, हा उपक्रम चालू राहिला.

३५ आता इसवी सनात प्रवेश करण्याचा कालखंड आला होता. सर्व हिंदुस्थानात हिंदूंप्रमाणे मुसलमानही (यानाच यवन म्हणण्यात येत असे.) स्थायिक झाले होते. कोठे यवन प्रबळ तर कोठे रजपूत प्रबळ; तर कोठे मराठे प्रबळ, असे हिंदुस्थानातील अनेक प्रांतांतून राजे आणि जनसमुदाय विखुरले गेले होते. ऐतिहासिकदृष्ट्या पाहावयाचे तर निरनिराळ्या राज्यांची नावे घेता येतील. उत्तर हिंदुस्थानात मोगल साम्राज्य, राजपुतान्यात रजपूत राज्य, बंगाल्यात बंगाल्यांचे राज्य आणि दक्षिणेत मराठ्यांचे राज्य अशी विभागणी झाली होती. इतिहास-

कार नेहमी या कालाचे वर्णन निरनिराळ्या राजांचे आणि राज्यकारभारांचे वर्णन करतात. येथे, याने असे केले, तेथे त्याने तसे केले; अशी लढाई झाली, असे तह झाले, असा राजा गेला, दुसरा आला, इ. इ. वर्णन इतिहासकार करतात. विचार करता असे दिसते की असे राजा आणि राज्य याचा मागोवा घेत इतिहासाकडे पाहाण्याऐवजी या सर्व कालखंडाकडे हिंदवी संस्कृती आणि यावनी संस्कृती यांचा संघर्ष अशा दृष्टिकोनातून पाहिले तर काय हरकत आहे? या दृष्टिकोनातून पाहिले तर इतिहास समजण्यास सोपा होतो आणि त्याची उकल अधिक सयुक्तिकपणे करता येते. राजकारणापेक्षा समाजकारणाचा विचार जास्त महत्त्वाचा असल्याने त्याचे निरीक्षण अधिक विचाराने करता येते.

३६ तेव्हा असे दिसून येते की यवनांनी आपली संस्कृती पसरविण्याचा जोरदार प्रयत्न चालू केला. धर्माचे वेड घेऊन लढाया सुरू केल्या. यांना धर्मयुद्धे म्हणण्यास काही हरकत नसावी. जो यवन नाही तो काफर. त्यास मारणे हा धर्म. याला विरोध हिंदू धर्मीयांचा. काय वाटेल ते झाले तरी यवन. व्हायचे नाही, असा हिंदूंचा हट्ट आणि या संस्कृतींमधील जो संघर्ष तो हिंदुस्थानचा इतिहास असे समीकरणच ठरून गेले. यासाठी हिंदवी राज्याचा राजा म्हणून कोणी राज्याभिषेक करून घेऊ लागले तर हिंदू धर्मासाठी म्हणून कोणी जीव देण्यास तयार झाले. कोणी देवळे पाडू लागले. तर कोणी मशिदी उद्ध्वस्त करू लागले. साधु-संत हिंदूधर्माचा प्रचार करू लागले. —यवन मुल्लामौलवी कुराणाचा प्रचार करू लागले. यामुळे अगोदरच धार्मिक दडपणाखाली असलेले हिंदू-मुसलमान समाज जास्ती जास्तीच धर्मबंधनाखाली अडकू लागले. हिंदूधर्मीयांमध्ये साधुसंतांचे असे पेव फुटले की त्याला काही मर्यादा उरली नाही. जो उठतो तो भागवत धर्माची पताका घेऊन नाचू लागतो, असा देखावा सर्वत्र दिसू लागला. आज ज्ञानेश्वर, उद्या तुकाराम, नंतर रामदास तर नंतर एकनाथ, नामदेव, कोणी कुंभार, कोणी धोबी, कोणी महार तर कोणी चांभार अशा अनेक जातींनी नामाचा घोष सुरू केला. समाजाची केविलवाणी स्थिती झाली

असता कोणी शांतरसाचा घोषा घतला. दोन वेळची भाकरी महाग झाली तर कोणी पांडुरंगाचा पाय धरला. मीरा के प्रभु नाचू लागली तर कबीर दोहे करू लागले. यवनात शिया आणि सुनी यांच्यात कलह माजले. धर हिंदू की बाटव त्याला. जिझिया कर बसू लागला. हे सर्व प्रकार धार्मिक युद्धाचेच नव्हते का ? सबंध हिंदुस्थान बाटवून मुसलमान करावयाचा अशी ईर्षा मुसलमान बादशहांनी बाळगलेली तर दिल्ली जिंकून तिथे हिंदवी राज्य स्थापन करायची मनीषा हिंदू राज्यकर्त्यांची !

३७ असा हा अंदाधुंदीचा आणि लढायांचा काल म्हणजे सामान्य जनतेचे मरण असते. या संघर्षातून काही निघत नव्हते. दिशाहीन, ध्येयहीन, केवळ वेड अगर स्वार्थ यापेक्षा यात काही जास्ती नव्हते. इतका वर्षानुवर्षे संघर्ष चालला आहे,त्याचे कारण शोधूया, त्यात काही समजूत निघते का बघूया, व्यर्थ भांडण्यात काय अर्थ आहे असा विचार काही सामाजिक स्तरात गुप्तपणे येत नसेल का असा संशय घेणेसुद्धा अप्रस्तुत ठरावे असा काल होता. कारण असा विचार म्हणजे "विचार" होता. तो धार्मिक, वर्तुळात अजिबात रुजण्यासारखा नव्हता. धर्मामध्ये विचाराला जागा नव्हती. असा कोठे विचार होण्याची हूल उठलीच तर दोन्हीही धर्ममार्तंड एक होऊन त्यास विरोध करीत. एरवी वैर असलेले निरनिराळे धर्म-पंथ आपणावर वैचारिक हल्ला होत आहे असे दिसताच एक होत आणि धर्मवेड कायम चालू ठेवीत. "राम रहीम सब एक है" अशा तडजोडीपर्यंत काम चाले.

३८ पण एवढ्यावरच भागत नसे असे दिसते. याच कालखंडात आणि परिस्थितीत कितीही विचार करता येत नसला तरी संकटपरंपरेने वैतागून जाणे हे स्वाभाविक होते. वर्षानुवर्षे पिढ्यान्‌पिढ्या अनागोंदी समाज व्यवस्थेने माणसे वैतागून गेली असणे साहजिक होते. या देवधर्मात काही अर्थ नाही, उगीचच या पुरोहितांनी, मौलवींनी आम्हास बेजार करून सोडले आहे असे वारे समाजात फिरू लागले असले पाहिजे. समाज विचार करण्याच्या मनःस्थितीत येत असल्याची लक्षणे दिसू लागली असली पाहिजेत. ही मानसिक बंडखोरीची अवस्था

त्या वेळच्या संत-महंतांच्या लक्षात आली असली पाहिजे. नाहीतर अशा बंडखोर वृत्ती दाखवणाऱ्यास एकदम "नास्तिक" ठरवून त्यांच्यावर शाब्दिक भडिमार करण्याचे कारण संत-मंडळींना पडलं नसते. कितीही दडपून टाकण्याचा प्रयत्न केला तरी नास्तिक माणसे पुनःपुन्हा डोके वर काढत असली पाहिजेत. भगवत् गीतेमधून, ज्ञानेश्वरादी अनेक साधुसंतांनी नास्तिकावर जे हल्ले केले आहेत त्यावरून हे स्पष्ट होते. एरवी मनोनिग्रहाचे, शांततेचे अवतार वाटणारे साधुसंत नास्तिकावर टीका करताना मात्र त्यांच्या सात पिढ्यांचा उद्धार करताना दिसतात. त्यांना बीभत्स शिव्या देतात. इतक्यानेच राग शांत न झाल्याने मानव-कोटीत जर सर्वांत शूद्र योनी कुणाची असेल तर ती नास्तिकाची असा राग ते व्यक्त करतात त्याला काय म्हणावे ? याच काल-खंडामधील दुसरी भौतिक अवस्था, भयंकर दारिद्र्याच्या रूपामध्ये वावरत असे हेही अभ्यासूनी ध्यानात घ्यावे. दुष्काळ, रोगराई, अवर्षण, लुटालूट, लढाया, कर या सर्वांमुळे माणसे त्रस्त झालेली असत. उद्योगधंदा अगर शेतीस लागणारे स्थैर्य अभावानेच दिसत असे. धार्मिक दबाव आणि आर्थिक विघटन यांची संगत इतिहासात पुनःपुन्हा दिसून येते.

३९ याच कालात म्हणजे इसवी सनाच्या मध्यावर एक मोठी मानवी सामाजिक घटना युरोपमध्ये घडत होती तिकडे थोडे पाहूया. जसे भारतात धार्मिक संस्कार समाजामध्ये रूढ होते त्याच प्रकारचे संस्कार युरोपमध्ये ख्रिश्चन धर्मात रूढ होते. धार्मिक छळ मोठ्या प्रमाणावर चालू होते. धर्मगुरू पोप हे हुकुमशहा झाले होते. एकाच धर्मात अनेक भांडणे चालू होती. त्यावरून युद्धे होत होती. कोणी कोणाचे मानीत नव्हते. अनागोंदी कारभार सर्वत्र ओकाळला होता. पोप महाराज हे येशू ख्रिस्त आणि बायबल याखेरीज दुसरे काही नाही असा प्रचार करत होते. सर्व जीवन एका धर्माभोवती गुंडाळण्यात आले होते. भारतीय कर्मकांड आणि ख्रिश्चन कर्मकांड यात जास्ती कर्मठ कोण हे ठरवणे अवघड झाले असते !

४० साहजिकच या अवस्थेला युरोपीय जनसमुदाय कंटाळले होते.

दारिद्र्याने आणि असुरक्षिततेमुळे ते उदासीन झाले होते. होता होता या औदासीन्याला एका सामाजिक संघटनेचे स्वरूप येऊ लागले. लोक हळूच पोपविरुद्ध बोलू लागले. त्यांच्या काही मागण्या होऊ लागल्या. धार्मिक जीवनाचे महत्त्व कमी करून विचाराला आणि व्यवहाराला जास्ती अवसर मिळावा अशा मागण्या जनसमुदायाकडून होऊ लागल्या. अर्थात पोप महाराजांना त्या एकजात अमान्य होत्या. त्या मागण्या फेटाळून लावण्यात आल्या. हा संघर्ष हळूहळू तीव्र होऊ लागला. माणसे मागण्या करीत होती आणि धर्मगुरू त्या फेटाळून लावत होते. हे भलेपणाने न होता बळजबरीने अधिक क्रूरपणे होऊ लागले. देहान्त शिक्षा देण्याचा अधिकार पोप महाराजांना होता. तो ते वापरू लागले. ख्रिश्चन धर्म जुनापुराणा झाला आहे, त्यातील आज्ञा अज्ञान-प्रसारक आहेत. बायबल हा धर्मग्रंथ आम्हास अमान्य आहे. येशू ख्रिस्ताचे देवपण हे एक थोतांड आहे असे नास्तिक विचार लोक मांडू लागले.

४१ तितक्याच कडकपणे पोप महाराज आपले हक्क गाजवू लागले. नास्तिक मताबद्दल कित्येकांना जिवंत जाळण्यात आले. अनेकांना फाशी देण्यात आले. हाल हाल करून मारण्यात आले. पण आंदोलकांनी आपला हट्ट सोडला नाही. केवळ मत-स्वातंत्र्या-साठी, विचार-स्वातंत्र्यासाठी, नास्तिक विचारासाठी कित्येकांनी आपणास जिवंत जाळून घेतले पण आपले विचार सोडले नाहीत. ही पुनरुत्थापनाची चळवळ सर्व युरोपखंडभर पसरली. तिला पाठिंबाच मिळत गेला. समाजातील निरनिराळ्या थरांतील लोक या चळवळीचे अनुयायी बनले. विचाराचे पारडे जड होऊ लागले. शेवटी या उत्थापनाला इतका आत्मविश्वास आला की त्यानी पोप महाराजांना निर्वाणीचा खलिता दिला,—— "मुकाट्याने तुमचा येशू ख्रिस्त, बायबल आणि ख्रिश्चन धर्म बाजूला घ्या नाही तर आम्ही तो उचलून फेकून देऊ. तुमच्या बायबलचे फाडून तुकडे करू. आम्ही तुमचे नेतृत्व झुगारून देऊ. आमच्या सुधारणेचा मार्ग आम्हाला मोकळा करून द्या !"

४२ पोप महाशयांनीही वेळ ओळखली. सर्वच जाण्याचा प्रसंग

आला तेव्हा जे थोडे सांभाळता येईल तेवढयावर आपले चंबू-गबाळे आवरण्याची त्यांनी तयारी दाखवली. यालाच मध्य-युगातील युरोपीय पुनरुत्थापन म्हणून जगभर ओळखले जाते.

४३ या पुनरुत्थापनानंतर युरोप खंडाचा नूरच बदलला. तेथील रहिवाश्यांनी आपल्या शृंखला तोडल्या. कोंडवाडयाची दारे तोडली. ते मानव मोकळे झाले. स्वतंत्र विचारी झाले. त्यांनी ज्ञानाची द्वारे सताड उघडी केली. शास्त्राचे नवे प्रयोग सुरू केले. शिक्षणाचे चौफेर सत्र सुरू झाले. नवी तत्त्वज्ञाने निघू लागली. शेतीला बहर आला. कारखानदारी सुरू झाली. व्यापाराला उधाण आले. जगभर दर्यावर्दी हिंडू-फिरू लागले. सर्व जगातून संपत्ती गोळा होऊन ती युरोप खंडात जमा होऊ लागली. व्यापारी, विद्वान, राजकारणी, शास्त्रज्ञ, कलाकुसरी यांनी युरोपीय नागरिकांना एका उच्च पातळीवर नेऊन ठेवले. युरोप खंड म्हणजे जगाचे नेतृत्व करणारे खंड म्हणून सर्वत्र समजण्यात येऊ लागले. धर्मयुगातून बाहेर पडणाऱ्या शास्त्रीय युरोप खंडाचा असा हा नवा पिंड होता.

४४ ही घटना समजून घेतल्यावर आपण पुन्हा हिंदुस्थानात येऊ. येथे या घटनेचा मागमूसही नव्हता. सर्व हिंदुस्थानभर यादवी युद्धे चालू होती. ती इतक्या थराला गेली होती की आपल्या भोवती काय चालले आहे याची जाणीवही त्यांना नव्हती. गृहकलहामध्ये त्यांची शुद्ध हरपली होती. देशाचा विचार करण्याचे कुणास सुचत नव्हते. आपल्या-आपल्यांत काय चालले आहे हे समजून घेण्याची कोणी खटपट करीत नव्हते. आपल्या बारीक स्वार्थापलीकडे कोणी पाहात नव्हते. इतकेच नव्हे तर आपल्या शेजारी दूरदूरच्या देशांतील माणसे येत आहेत आणि ते व्यापारधंद्याखेरीज आणखी पुष्कळ उद्योग करीत आहेत याचीही जाणिव कोणास झाली नाही. त्यांची दखल घेतली नाही. हे लोक कोण आहेत, कोठून येत आहेत, यांना काय पाहिजे याची नीट चौकशीही कोणी केली नाही. भारतीय वातावरण आपल्या मुशीतच गुरफटून राहिले होते. समुद्रगमन म्हणजे पाप. ते कोणी करीत नसे. तसे केले तर प्रायश्चित्त घेऊन शुद्ध

व्हावे लागत असे.

४५ "काल चालला पुढे." इसवी सनाच्या हजार पंधराशे वर्षांच्या वाटचालीचा थोडक्यात मागोवा घेतल्यावर पुढील घटना पाहाणे योग्य होईल. इतिहासाच्या वाटचालीचा वेग जसजसे आधुनिक कालाकडे आगमन होत जाते तसतसा वाढत जातो. घटना लवकर लवकर होऊ लागतात.जे घडायला तीन हजार वर्षांपूर्वी शेकडो वर्षे लागत तेच घडायला आधुनिक कालात पाच-पन्नास वर्षे पुरी होऊ लागली. युरोप खंडात क्रांती झाली असे म्हणे-पर्यंत तिची आघाडीची फळी सर्व जगभर पसरली. काही राष्ट्रे आफ्रिकेत घुसली तर काही आशियात शिरली. दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथेही वसाहतकारी स्थायिक होऊ लागले. नुसती कल्पनाच करायची झाली तर अशी करावी की टीचभर युरोप खंडाला जग बहाल मिळाले होते आणि ते खोऱ्याने संपत्ती ओढून आपल्या घरी घेऊन जात होते. स्वतंत्र विचाराच्या बंडाला केवढे बक्षीस मिळाले होते !

४६ या वाटणीत इंग्रज राष्ट्राच्या वाट्याला हिंदुस्थान आले. वरिष्ठ प्रकारचे ज्ञान, वरिष्ठ प्रकारची साधने, जोरदार तोफा, बंदुका, दारुगोळा, शिस्त आणि ध्येय यांच्या जोरावर हिंदुस्थानातील हिंदू-मुसलमानांवर त्यांनी सहज विजय मिळविला. सर्व हिंदुस्थान ब्रिटिशांनी पादाक्रांत केले. नुसतेच पादाक्रांत केले असे नाही तर ते इतक्या व्यवस्थितपणे राज्य करू लागले की हिंदी लोक त्यांना दुवा देऊ लागले. हजारो वर्षांच्या अनागोंदी कारभारानंतर थोडेसे जरी स्थैर्य मिळू लागले तरी जनतेच्या भावनांची काय प्रतिक्रिया होते याचे हे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल. तसेच भारतीय हिंदू-मुसलमानांच्या नालायकीचे-ही हे एक उत्तम उदाहरण होऊ शकेल. १८५७ सालचे बंड म्हणजे उशिराने जाग आलेल्यांची धावपळ होती. बैल गेला होता, झोपा मोकळा पडला होता ! "तुम्ही केव्हा आलात ते आम्हाला समजलेदेखील नाही." असेच भारतीय म्हणत होते की काय ते समजत नाही. त्याला उत्तरही इंग्रज देत असले पाहिजेत. "नुसता व्यापार-धंदा करायसाठी आलो नाही,

जर जमले तर तुम्हास थोडी अक्कल शिकवायलाही आलो आहोत !"

४७ हिंदुस्थानच्या साहित्यिक क्षेत्रात एक मोठा स्फोट झाला. हिंदी लोक इंग्रजी वाचू लागले ! असा स्फोट अखिल भरत खंडात यापूर्वी कधीच झाला नव्हता. समुद्रगमन करू नये आणि यावनी भाषा शिकू नये असा दंडक होता. डोळ्यावरील ही दोन झापडे होती. त्यांपैकी एक इंग्रजांच्या शिकवणुकीमुळे निखळून पडले. प्रथमच हिंदी लोकांना दृष्टी आली. त्याना जे इंग्रजी भाषेचे रूप दिसले त्याने ते थक्कच होऊन गेले. आश्चर्यचकित होऊन गेले. एखाद्या भाषेमध्ये ज्ञानाचे इतके मोठे भांडार भरून ठेवलेले असते हे त्यांना खरेच वाटेना ! असा विषय नाही की ज्यावर इंग्रजी भाषेत ग्रंथ नाही असे त्यांना दिसून आले. काव्याचे अनेक प्रकार, नाटचाची नाटचपूर्ण मांडणी, गद्याचे रोमांचकारी प्रत्यय, निबंधांची अनेक विषयांवर मांडणी, राजकारणावर लिखाण, लोकशाहीचे चित्र, तत्त्वज्ञानाचे खोलवर विवेचन तर शास्त्रीय प्रयोगावर प्रत्ययकारी प्रयोग. सर्वच नवे ! त्यात कोठं पहावे, काय घ्यावे आणि किती शिकावे याला अंत नव्हता. संस्कृत भाषेचा गर्व पार उतरून गेला. भारतीय तत्त्वज्ञान म्हणून एकमेव विषयावर अभिमान धरणारे, इंग्रजी भाषेमध्ये रूपांतरित झालेल्या रोमन, ग्रीक, फ्रेंच, जर्मन, इटालियन भाषांतील तत्त्वज्ञानाची दोन हजार वर्षांची प्रगती पाहून अक्षरश: वेडे झाले. भारतीय संस्कृतीची अपूर्णता प्रथमच भारतीयांचे ध्यानात आली. तत्त्वज्ञान म्हणजे शब्दांचा फापट पसारा नव्हे हे मान्य करावे लागले. इंग्रजी भाषेस "वाघिणीचे दूध" असे म्हणण्यात येऊ लागले आणि कधी नव्हे ते स्वातंत्र्याचे वारे भारतात पसरविण्याचे श्रेय इंग्रजी भाषेस देण्यात येऊ लागले. लोकशाही म्हणजे काय ? आपले आपण, आपणावरच राज्य करायचे ? हे विचित्रच वाटायचे. राजा नाही ते राज्य कसे चालायचे ? समाज म्हणजे काय हेच इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढीच्या लक्षात येईना. लक्षावधी हिंदी हिंदुस्थानात आहेत. मग येथे समाज आहे का नाही असे विचारावेसे त्यांना वाटत असल्यास नवल नाही. कारण समाज म्हणजे माणसांनी



मराठी ग्रंथ संग्रहालय
२९८८
दा. क्र. २३६०७४
दिनांक २१/५/६३

एकत्र येऊन विचार करण्याची जागा. अशा एके ठिकाणी जमणाऱ्या माणसांना मत म्हणून काही असते. प्रत्येक व्यक्तीला हक्क म्हणून काही असतात. प्रत्येकाला जबाबदारी म्हणून काही सामाजिक देणे असते. हे सर्व हिंदी नागरिकांना नवे होते. इंग्रजी शिक्षणामुळे पौराणिक भारतीय मनावर उमटलेला ठसा असा गमतीदार होता.

४८ पाच पन्नास वर्षांत इंग्रजी भाषा समाजातील उच्च थरातील व्यक्तींनी आत्मसात केली. ज्याना इंग्रजी येते असा एक वर्ग त्यांच्या निराळ्या विचारांनी निर्माण होऊ लागला. इंग्रजी कायद्याचा जोराने अभ्यास होऊ लागला. पार्लमेंट पद्धतीच्या कारभाराचे कौतुकाने निरीक्षण होऊ लागले. इंग्रजी भाषेमुळे दिसू लागलेल्या नव्या जगाकडे पाहात असतानाच काही व्यक्तींच्या ध्यानात येऊ लागले की इंग्रज लोक ज्ञान देत आहेत खरे; पण त्याच बरोबर दुसरे काही घेऊन जात आहेत. असे ज्ञान देत जर ते दुसरे जे काही आहे ते सर्व घेऊन गेले तर आपणावर उपाशी मरण्याची पाळी येईल ! तेव्हा या दुसऱ्या बाबीकडेही लक्ष दिले पाहिजे. जी संपत्ती इंग्रज घेऊन जात आहेत ती मिळविलेल्या राज्याच्या जोरावर घेऊन जात आहेत. तेथे आपले काही चालणार नाही. संपत्तीचा लोंढा परदेशाकडे लागला आहे तो थांबण्यास आपल्या हातात सत्ता पाहिजे. ती सत्ता मिळविण्यास आपले आपल्याला स्वातंत्र्य पाहिजे —स्वराज्य पाहिजे. ज्या इंग्रजी भाषेच्या माध्यमातून भारतीयांना ज्ञान मिळाले त्याच भाषेच्या माध्यमातून स्वराज्याची तहान निर्माण झाली. इंग्रजी भाषा इंग्रजावरच उठली. पण या प्राथमिक इंग्रज कालात जो वैचारिक उलाढाल झाली त्यात प्रथमच भारतीयांनी आत्मनिरीक्षण करून भारतीय संस्कृतीवर ताशेरे झोडण्यास सुरुवात केली होती हेही ध्यानात घ्यावे लागते. भारतीय संस्कृतीवर आज हल्ला करण्यास तसे सबळ कारण आहे. एक शतकापूर्वीच या संस्कृतीची विकृती त्या वेळच्या माणसांना जाणवू लागली होती.

४९ आसेतुहिमाचल हिंदुस्थान एक शतक इंग्रजाच्या आधिपत्या-

खाली संपूर्ण पारतंत्र्यात होता. या शतकात ज्या घटना हिंदुस्थानात घडल्या त्या सर्वांचा मिळून जो परिपाक झाला त्यातून एकमुखी स्वातंत्र्याची मागणी निघाली. दीर्घ पारतंत्र्यातून निघालेला हा पहिलाच अखिल भारतीय आवाज असे म्हणावे लागेल. पारतंत्र्यातून निघालेली ही एकत्वाची भावना, हीसुद्धा काही कमी नव्हे असेच म्हणावे लागेल. स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. तिच्या बरोबरच समाज-सुधारणेचीही चळवळ सुरू झाली. पण चळवळीच्या प्रमुखांना लवकरच कळून आले की स्वातंत्र्य मिळविणे एकवेळ शक्य होईल पण समाज-सुधारणा करणे फार अवघड जाणार आहे. तेव्हा त्यांनी आपले लक्ष फक्त राजकारणावर ठेवले. स्वराज्य मिळवले. समाजास पुढे ढकलण्यात येऊ लागले. निवडणुका झाल्या, राज्यघटना झाली, राष्ट्रपती झाले, निधर्मी राज्यही स्थापन झाले. पौराणिक कथांच्या वातावरणात वाढलेल्या समाज-प्रमुखांना वाटले की आत्मा जसा एक देह जुना झाला की तो टाकून दुसरा धारण करतो किंवा आधुनिक कालात आपण जसे बाजारात जाऊन "रेडिमेड" कोट विकत घेतो तसेच आपण करूया. आपली जुनी झालेली समाजरचना बदलून एक "रेडिमेड" लोकशाहीचा कोट घेऊन तो समाजाच्या अंगावर घालू. असे केले की झाले आपले काम. आली लोकशाही भारतात! पण तसे होईना. क्रांतीची सुरू झालेली लाट लोकशाही स्थापनेपासून मरगळू लागली. क्रांती थांबली, पुढे काही होईना. दिवसानुदिवस आणि वर्षानुवर्षे समाज जास्त जास्त अडचणीतच येऊ लागला. अनाचार वाढला, दारिद्र्य वाढू लागले. स्वातंत्र्याच्या २५-३० वर्षांच्या अनुभवांत कोठे आशेचा किरण दिसेना. अशा निराशेच्या वातावरणात विसाव्या शतकाच्या अखेरीजवळ भारतीय समाज येऊन थडकला.

५० येथपर्यंत विवेचन केल्यावर एका गंभीर विचाराकडे वळावे लागेल. भारतात लोकशाही आणली म्हणजे आपण काय केले? कुठल्याही देशात लोकशाही येण्यापूर्वी अनेक सामाजिक अवस्थांतून समाजास जावे लागले. तसे काही भारतात झाले का? समाजक्रांती म्हणजे काय काय व्हावे लागते, लोकशाही स्थापनेच्या

अगोदरची समाजक्रांती म्हणजे त्यात काय काय होऊ शकते,व्हावे लागते याचा उलगडा करावा लागेल. सर्वात प्रथमची अवस्था म्हणजे भंगाची. जे जुने झाले, निकामी झाले, जे नको आहे ते मोडायचे, तोडायचे, जाळून टाकायचे. पुन्हा त्यापासून उपद्रव होणार नाही, याची खबरदारी घ्यायची. दुसरी अवस्था नव्या विचारांची. वैचारिक क्रांतीची. जे जाळून टाकले त्याच्या जागी नवे आणून लावायचे. ही क्रिया झाल्यावर तिसरी क्रिया, नवविचाराच्या नव्या समाज-स्थापनेची. सर्वच नवे असल्याने तो स्थिर आणि नक्की होईपर्यंत अनुभव घ्यायचा आणि चौथी अवस्था म्हणजे लोकशाही राज्यघटना तयार करण्याची. या क्रांतीच्या अवस्थांतून हिंदुस्थान गेले आहे का हा एक मोठा यक्षप्रश्न आहे.

५१ जुने मोडायचे हा पहिला विचार घेऊ. याचे प्रारंभापासूनच वादास आरंभ होणे शक्य आहे. का मोडायचे असेही विचारण्यात येईल. आहे ते बरे आहे; त्यातूनही बिघडलेच असेल तर ते सुधारून घेऊ. हळू हळू सुधारत सुधारत पुन्हा सगळा हिंदू धर्म आणि हिंदूसमाज त्यातील सर्व अनिष्ट प्रकार वगळून सन्मार्गावर आणू. हे विचार लिहिणे सोपे आहे; पण आचरण्यात आणणे फार अवघड आहे. याची जाणीव ठेवूनच माणसाने वागावे हे बरे. इतके होऊनही भारतीय संस्कृती अगर हिंदूसमाज हा मोडकळीस आला असून तो मोडीत काढावा या विचारास बराच पुरावा मिळत आहे.

५२ मुख्य विचार असा की आता कमीत कमी निदान पाच हजार वर्षे तरी भारतीय संस्कृती प्रचलित आहे. एवढ्या कालावधीत या संस्कृतीने समाजाचे काय भले केले? अभिमान मानावा अशी कोणती कर्तबगारी करून दाखवली? समाजाला प्रगल्भ आणि समृद्ध बनवण्यात किती यश मिळवले? संस्कृती स्थापन केली म्हणजे काय केले? पुनर्जन्माचा सिद्धान्त मांडला? आत्म्याचा शोध लावला? मायावाद निर्माण केला? भक्ति-मार्गाचे लोढणे गळ्यात अडकवले? समाजाचे तुकडे करून अठरा पगड जाती निर्माण केल्या? काय, केले तरी काय या संस्कृतीने?

सर्व मिळून एवढे केले असे म्हणता येईल की अज्ञ जनांना फसवून त्यांना सापळ्यात कोंडण्यासाठी धूर्त माणसांनी एक सापळा तयार केला.

५३ बिचारी भोळी बापडी गरीब हिंदू माणसे स्वकीयांच्या आणि परकीयांच्या पायाखाली तुडविली जात होती. जो येतो तो त्यांच्यावर राज्य करतो. त्यांना लुबाडतो, त्यांच्या पाठीचा कणाच तोडून टाकतो. भक्तिमार्गाची भीक मागत तो दारोदार फिरतो. मायावादात अडकून दोन हात गुडघ्यावर ठेवून स्वस्थ बसतो. अशा या भारतीय संस्कृतीचे आणि समाजाचे कुठवर जतन करायचे? त्यापेक्षा ती समजून उमजून मोडून टाकली तर काय वाईट होईल? विचार करावयास लावणारी ही कारणपरंपरा आहे. कोणालाही ती सहज धुडकावून लावता येणार नाही. भारतीय संस्कृती म्हणजे एक जुने घर आहे. ते जुन्यापुराण्या सामानाने भरले आहे. सर्व मोडके तोडके झाले आहे. नव्याने वापरता येण्यासारखे त्यात काही राहिले नाही. ज्याला हात लावावा ती वस्तू गंजून निकामी झाली आहे. हे घर धुरळ्याने भरले आहे. त्यात कोळिष्टके भरली आहेत. त्यातील सर्व पडके झडके झाले आहे. आता जर कोणी म्हणाले की या घरात राहायचे तर प्रथम त्यातील सर्व अडगळ हलवावयास नको का? त्या घरात नवीन काही करायचे म्हटले तर तेथे जागाच नाही. मग जुने सामान बाहेर काढावयास नको का? त्याशिवाय दुसरे काही करताच येणार नाही. सामान बाहेर काढण्याखेरीज गत्यंतरच नाही

५४ अशा परिस्थितीत जर कोणी सामान बाहेर काढण्यास विरोध करू लागला, आहे त्या जुन्या सामानातच राहण्याचा प्रचार करू लागला, किंवा हे जुने पुराणेच सामान चांगले आहे असे म्हणू लागला तर कसे? आम्ही यातच सुखासमाधानाने हजारो वर्षे राहिलो आहोत तेव्हा ते कशासाठी काढायचे असे म्हणू लागला तर कसे? आता लोकशाहीचे दिवस आले आहेत तेव्हा या महत्त्वाच्या अखिल भारतीय विषयावर सार्वमत घेऊ असे म्हणू लागला तर? अशा सार्वमतात ७५ टक्के मत जुन्या सामानाचे

बाजूने पडले तर? उरलेल्यांनी हात जोडून स्वस्थ बसायचे? आला संघर्ष! काही अविवेकींनी म्हटले की जुने सामान राहूदे घरात, त्यातच नवे ठेवू, त्यातच लोकशाही ठेवू, त्यातच गांधीवाद ठेऊ, त्यातच समाजवाद ठेऊ, त्यात बौद्धवाद ठेऊ, त्यातच नवमत वाद ठेवू. या गलबल्यात त्या नव्याजुन्या सामानाचे आणि घराचे काय होईल याची कल्पना करता येत नाही! मृतवत् झालेल्या भारतीय झाडाच्या खोडावर जर कोणी नवी कलमे बांधण्याचा उपक्रम केला तर ती कशी फुटतील येवढा साधा विचारही माणसाच्या मनात येत नाही याचे नवल वाटते.

५५ अशा रीतीने जुनी संस्कृती सोडून नव्या संस्कृतीत जाण्याचे धाडस अनेक राष्ट्रांनी केले आहे. या पूर्वीच उल्लेख करण्यात आलेले युरोप खंडाचे पुनरुत्थापन म्हणजे त्या देशातील नवी संस्कृतीच म्हणावी लागेल. अलीकडील उदाहरण म्हणजे जपानचे. आपल्या उन्नतीसाठी नव्या विचाराचे आचरण करावयास पाहिजे हे समजल्यावर जपानने आपल्या जुन्या संस्कृतीत मोठे फेरबदल केले. त्याहीपेक्षा मोठे उदाहरण पाहिजे असल्यास सर्व साम्यवादी देशांचे देता येईल. त्यांनी जुनी संस्कृती तर सोडलीच पण देवधर्म या कल्पनेसच उखडून टाकले. या सर्व समाजक्रांतीपासून त्या देशांचे काही नुकसान झालेले दिसत नाही. मग आपण भारतीयांनीच का भ्यायचे?

५६ समाजक्रांती म्हणजे सोपी गोष्ट नाही. त्यात मोठा संघर्ष आहे. पण केवळ संघर्ष आहे म्हणून गप्प बसू लागलो तर भारताची सुधारणा व्हायची केव्हा? तेव्हा असे वाटते की होऊ द्या तरी तो संघर्ष एकदा. होऊन होऊन काय होईल? संघर्ष केला नाही तरी दारिद्र्यात मरायचे आणि केला तरी मरायचे. मग करून तरी पाहूया. सुटका झाली तर तेवढेच बरे.

५७ असे हे जुनी संस्कृती भंग करण्याचे मोठे आव्हान भारतीय समाजापुढे उभे आहे. त्यातून पार पडल्याखेरीज दुसऱ्या कृतीस आरंभच करता येत नाही. भारतीय स्वराज्य-प्राप्तीनंतर समाजास जी मरगळ आली आहे त्याचा विचार चालू आहे.

त्यातील प्रथम कृती भंगाची. त्याचा थोडा विचार करून झाला. आता वैचारिक क्रांतीकडे वळू.

५८ भारतीय वातावरणात विचाराच्या बैठकीला पहिल्यापासून विरोध आहे. पुराण कालापासून लेखनद्वारा जे पुढे मांडण्यात आले, त्यानंतर मध्ययुगात ज्याचा पुनरुच्चार करण्यात आला आणि आधुनिक कालात जे प्रचलित आहे त्यात विचाराला प्राधान्य देणारे थोडे आहे. वेद अपौरुषेय आहेत. ते माणसाने लिहिलेले नाहीत. ते एकदम लिहूनच वरून आले. त्यामुळे त्यांच्यावर विचार करण्याचा प्रश्नच नाही. त्यात जे काही आहे ते पक्के. त्यानंतर आले शब्दप्रामाण्य. तेथे शब्दाला महत्त्व. जे शब्दात नाही त्यावर विचार करणे नाही. शब्दात जेवढे असेल तेवढ्यावर चालायचे. तेवढेच आपले भांडवल. आणि विचारापासून दूर जाण्याचे तिसरे कारण म्हणजे विचार करणाऱ्याला देण्यात येणारी शिक्षा! तो नास्तिक. - असा हा सर्व बाजूंनी वैचारिक फळीवर दाब ठेवण्यात आला होता. त्याला कंटाळून संस्कृतमध्ये एक सुभाषित रचण्यात आले होते ते असे--वेद एक सांगतात तर श्रुती दुसरेच सांगतात. ऋषी-मुनींचे आवाज निरनिराळे निघतात. यामुळे धर्माचे तत्त्व कुठे गुहेत पडले आहे ते सापडत नाही. मग माणसाने काय करावे? —तर सर्वजण जे करतात ते करावे! म्हणजे शेवटी विचार नाहीच.

५९ तेच भारताबाहेर विचारक्रांतीला किती बहर आला होता ते आपण युरोपियन पुनरुत्थापनाचे कालात पाहिले. सर्व समाजक्रांतीचा पाया वैचारिक क्रांतीने रचला. त्यात वैचारिक स्वातंत्र्यासाठी किती जणांनी आपणास जिवंत जाळून घेतले, कित्येकांनी प्राणार्पण केले, तर वाटेल तेवढ्या यातना सोसण्यास समाजाचे मोठे मोठे गट कसे तयार झाले, यावरून विचार-क्रांतीचे बीज समाजात किती खोल रुजले होते ते समजून येते. धार्मिक लिखाणावर हल्ले करण्यात खिश्चन समाजाने मोठीच कामगिरी केली आहे. आत्मनिरीक्षण निःस्पृहपणे केले आहे. "मी खिश्चन का नाही" अशा मथळ्याची पुस्तके मोठे मोठे

ख्रिश्चन तत्त्वज्ञ लिहू लागले. धार्मिक खुळ्या समजुतींची खूप थट्टा करण्यात येऊ लागली. हे सर्व विचार-स्वातंत्र्याचेच लक्षण आहे. समाजाच्या अभ्युदयासाठी विचारशील माणसानी किती किंमत दिली आहे हे भारतीयांनी पाहावे. पाश्चिमात्य समाजाला जी भरभराट आली, ती फुकट आलेली नाही. ऐती कुणी वाढून त्यांचे पुढे मांडली नाही. ती भरपूर महाग पडली आहे. त्याचा फायदा आज ती संस्कृती उठवत आहे. धर्माच्या चिखलात रुतून बसलेल्या समाजाला बाहेर काढण्याचे काम वैचारिक क्रांतीनेच केले आहे.

या प्रांतात आमच्या भारतीयांनी काय केले ?

६० पूर्वी काय केले हा प्रश्न दूरच राहूद्या. आज काय करत आहेत असे विचारले तरी त्यास काय उत्तर आहे? या आधुनिक कालात तरी विचारक्रांतीला भारतात तोंड लागले आहे का ? देवाधर्मावर आपला अजिबात विश्वास नाही, येवढे नुसते म्हणण्याचे धाडस किती जण करीत आहे? देवाधर्मावर मुळापासून हल्ला करूया असे प्रसिद्ध करण्याची छाती किती साहित्यिकांत आहे, संपादकांत आहे, वर्तमानपत्रांत आहे, मासिकांत आहे? सर्व जण लपून छपून, भीत भीत अर्धवट मार्गानी, काही झाले तर झाले, नाहीतर नाही इतक्याच प्रमाणावर थांबत आहेत. कोणी वैचारिक क्रांतीची आवश्यकता प्रतिपादन करणारा मजकूर प्रसिद्धीसाठी पाठवला तर तो छापण्याचे धाडस किती वर्तमानपत्री धंद्यांत आहे? असे हे सुशिक्षितांचे भेदरट भारतीय जग आहे. भारतीय सुशिक्षित तूर्त काय करतो? स्वार्थ शिकतो, स्वार्थ शिकवतो आणि स्वार्थ साधतो. नव्या वैचारिक जगात येण्यास तो भितो.

६१ साक्षरतेने ज्ञान वाढते, शिक्षणाने ज्ञान वाढते असे म्हटले जाते. आजचे साहित्य आणि साहित्यिक पाहिले म्हणजे शिक्षणाने अज्ञान वाढते असेच म्हणावे लागेल. रोजचे राशिवार भविष्याचे वर्तमानपत्री कॉलम दुसरे काय सांगतात? नुसती अस्पृश्यतेवर वैचारिक बंडखोरी करण्याऐवजी डॉ. आंबेडकरांनी

भारतीय संस्कृतीवरच हल्ला केला असता तर एक मोठे कार्य झाले असते. पण ते झाले नाही. भारतीय सहिष्णुतेत विचार-क्रांती बसत नव्हती !

६२ भारतीय माणूस बाहेरच्या जगात टी. व्ही. वापरतो, विमानाने प्रवास करतो, रेडिओ ऐकत बसतो पण आत घरातील कोपऱ्यात साईबाबाचा फोटो लावून त्याची पूजा करतो ! मनाने तो दुबळा आहे. जुन्या पौराणिक संस्कृतीचा पगडा त्याचे मनात इतका खोल रुजला आहे की कितीही आधुनिक जगात त्याला आणून सोडले तरी तो मागे जाऊन जुन्या गोष्टीच बोलतो आणि करतो. पार्लमेंटमध्ये तो कौरव-पांडवांचे युद्ध खेळतो, आम जनतेला तो महागाईने राम वनवासास नेतो आणि काही एक न करता तो वसिष्ठ-वाल्मिकी ऋषींच्या यज्ञाभोवती हात शेकत बसतो. विचारक्रांती भारतीय तत्त्वज्ञानाला पेललीच नाही. विचारक्रांतीच्या अभावी भारतीय जीवन इतके कुजले आहे की त्याला आपल्या भीषण दारिद्र्याचीही लाज वाटेनाशी झाली आहे. आर्थिक विषमता भारताइतकी दुसऱ्या देशात दिसत नाही. एकीकडे श्रीमंती उतू चालली आहे; तर दुसरीकडे लाज राखण्यापुरते वस्त्र अंगावर मिळणे दुरापास्त झाले आहे. ही आर्थिक विषमता मानवाने निर्माण केलेली आहे. ती घालवणे ही एक विचाराधीन गोष्ट आहे. योग्य विचाराने ती घालवता येणे शक्य आहे. पण हे काम कुणी करायचे ? विचारक्रांतीची आवश्यकता आहे ती यासाठीच.

६३ विवेचन करताना स्वातंत्र्यानंतर उदासीन जनतेच्या विचारा-साठी पहिल्याने जुनी संस्कृती तोडण्याची आवश्यकता मांडली, त्या नंतर विचारक्रांतीची जरूरी दाखवण्यात आली. या दोन्ही सूत्रांचे रूप मोठे आहे, तितकेच त्यावरील विवेचनही मोठे होऊ शकेल. पण स्थलाभावी हा निबंध पुढच्या मार्गक्रमणावर न्यावा लागत आहे.

६४ तिसरा विचार नव्या समाज रचनेचा. आत्तापर्यंतच्या विवेच-नात असे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न करण्यात आला की

भारतीय संस्कृतीने समाजभावना मारून टाकण्याची खटपट केली. विचार करण्यासाठी सामाजिक प्रयत्न होऊ नयेत म्हणून वर्णव्यवस्था करण्यात आली. येवढे मात्र खरे की एकत्रित विचारास विरोध असला तरी एकत्रित कर्मकांड, पूजा-अर्चा, भजनकीर्तन, यास पूर्ण मुभा होती. ती सर्वांनी मिळून केली तरी चालत होते. या प्रथेचे आधुनिक स्वरूप पाहण्यासारखे आहे. या धार्मिक प्रथेला कल्पनेबाहेर उधाण आले आहे. पंढरपूरच्या लाखो वारकऱ्यांच्या दिंड्या, गंगा-यमुनेमधील कोट्यवधी भक्तांच्या स्नानपर्वण्या, तिरुपतीला होणारा जनसागराचा अमर्याद जमाव, हे आजच्या भारतीय जमावाचे, म्हणजेच भारतीय समाजाचे खरे रूप आहे. हे रूप काय दाखवते? भारतीय जनसमुदाय आज कोणच्या अवस्थेत आहे याचे हे चित्र आहे. शेकडो वर्षे हे जमाव जमत आहेत. डोके आपटून घेत आहेत. मोठी समाजशक्ती वाया घालवत आहेत. पण शेकडो वर्षांत या जमावाला काही ज्ञान देऊन "हे बरे नाही" येवढे सांगण्यापुरता प्रभावी विचारवंतांचा गट जमत नाही हे केवढे आश्चर्य! याचकरिता समाजरचनेत मोठी क्रांती व्हायला पाहिजे असे मत स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे. या विचारांना विरोध करणाऱ्यांचा एक मुद्दा असा असतो की अशा प्रकारच्या अंधश्रद्धा कुठल्या धर्मात नाही? धार्मिक यात्रा कुठल्या धर्मात नाही? मग आम्हालाच का नावे ठेवता? त्याला उत्तर येवढेच देता येईल की इतर धर्मांत वेडे प्रकार चालू आहेत म्हणून आमचेही धर्मात ते चालू द्यावे हा युक्तिवाद बरोबर होऊ शकत नाही. इतर धर्मीयांनी पाहिजे तर ते काढावेत अगर काढू नयेत. तो त्यांचा प्रश्न आहे. पण आमच्या धर्मातील आणि समाजातील वेडे प्रकार आम्ही काढून टाकण्यास काय हरकत आहे?

६५ कोणी म्हणतो की या परवण्या आणि यात्रांनी मनाला केवढे समाधान येते ते का काढून घेता? याला उत्तर असे आहे की हे समाधान आणि हा आनंद हेच आमच्या अमर्याद दारिद्र्याचे मूळ कारण आहे. या अंधश्रद्धेतूनच आमच्या हजारो वर्षांच्या दारिद्र्याचा जन्म झाला आहे. या अंधश्रद्धेतून जे समाधान

निर्माण होते तेच हात जोडून दारिद्र्यात लोळत पडण्यास शिकवते. आणि ही अंधश्रद्धा काढून टाकण्यासाठी समाजामध्ये जी फळी उभी करायची त्यासाठीच समाजक्रांती पाहिजे. नुसते समाधान अगर आनंद पाहिजे असेल तर तो दोन पैशाच्या गांजाच्या गोळीनेही येतो! मग त्याचाही प्रचार करायचा का? 'धर्म ही अफूची गोळी आहे' असे साम्यवादी म्हणतात. यातील खरेपणा पटविण्यासाठी फार दूर जावे लागत नाही. गांजाच्या गोळीने एक माणूस एक दिवस गुंगीत राहील पण धर्म या अफूच्या गोळीने कोटयवधी माणसे हजारो वर्षे गुंगीत राहातात त्याचे काय?

६६ हा निबंध येथवर जर कुणी वाचला आणि विचारले की "काय हो तुम्हाला काहीच पसंत नाही, सर्वांना नावे ठेवता, इतका का तुमचा राग भारतीय संस्कृतीवर? तुम्हालाच सर्व समजते अशा आवेशात तुम्ही बोलता. आपल्यात कोणी शहाणे होऊन गेलेच नाहीत का"? याला उत्तर असे द्यावे लागेल की आपल्यात शहाणे होऊन गेले असतील. पण तो प्रश्न महत्त्वाचा नाही. आपल्यात किती मतिमूढ राहिले हा महत्त्वाचा प्रश्न आहे!

६७ यासाठी आपला इतिहास थोडक्यात पाहावा लागेल. पौराणिक कालातील भारतीय संस्कृतीच्या उगमापासून पाहाता असे दिसून येते की सुरुवातीपासूनच या संस्कृतीत समाजविद्रोह दिसून येतो. आरंभ-कालापासून या संस्कृतीची शिकवण मानवाच्या अभ्युदयासाठी रचलेली दिसत नाही. या संस्कृतीत अनेक भ्रम, अधोगतीला नेणाऱ्या अनेक कल्पना, चुकीचे आदेश, निराश करणारे उपदेश, निष्क्रिय करणारे कर्मकांड, उदास, निरिच्छ निर्वीर्य करणारे प्रघात जाणूनबुजून अंतर्भूत करण्यात आले आहेत. त्या सर्वांचा परिणाम भारतीय माणसावर आणि मनावर इतका हानिकारक झाला आहे की भारतीय माणूस या जगात राहाण्यास नालायक झाला. त्याला कोठेच काही जमत नाही, कुठेच काही करता येत नाही. जेथे पाय ठेवील तेथे तो मारच खातो. त्याचा जीवनक्रम पाहिला तर मुळापासून तो नुसता

मारच खात राहिलेला दिसतो. असा मानवसमाज ज्या संस्कृतीने निर्माण केला तीच्याबद्दल आदर का वाटावा? पुराण कालानंतर पाहिले तरी काय दिसते? हिंदू राज्ये धडाधड एकामागून एक कोलमडून पडली. का? जिद्द नाही, पराक्रम नाही, ईर्ष्या नाही, ध्येय नाही, काही नाही. कुणीही यावे जरा अंगाला हात लावला की खलास! विरोध नाहीच. सहिष्णू! त्यानंतर मोगल आले, त्यांनी सर्व भारत ढवळून काढला तरी सर्व गुपचूप! होऊद्या काय व्हायचे ते. आम्हाला कशाचे काही नाही. इंग्रज आले! येऊद्यात. तेही येऊद्यात. खाऊ त्यांच्या चार लाथा. इतक्यांच्या खाल्ल्या तर त्यांच्याच का नकोत? त्या नंतर स्वराज्य मिळाले. मग तरी माणसाला जाग यावी; पण नाही. तेही नाही. आयते पदरात पडलेले अविच्छिन्न भारतीय स्वराज्य मिळाले तरी त्याचे कुणाला काही नाही. तीस वर्षांत त्या स्वराज्याचे तीन तेरा करून टाकले. अशी एक दिशा नाही की जिथे अधोगती नाही, भ्रष्टाचार नाही, दारिद्र्य नाही, लांडीलबाडी नाही, हे आमचे स्वतंत्र हिंदुस्थान ३० वर्षांत आम्ही तयार केले. ही आमची कर्तबगारी. आगीच्या डोंबातून, बेचिराख अवस्थेतून दुसरे देश वर निघून भरभराटीच्या शिखरावर पोचले तरी आम्ही जेथे आहोत तेथेच! अशा संस्कृतीचा राग येईल नाही तर काय होईल? केवळ निरुत्तर करण्यासाठी कोणी विचारले की ही संस्कृती घालवून तिच्या जागी काय ठेवणार? तर उत्तर येवढेच द्यावे लागेल की ही संस्कृती मोडण्यात जर यश आले तरी ते कमी नाही. ते होऊद्या. तेवढे झाल्यास पुढे काय करायचे, ते त्या वेळचे जे असतील ते ठरवतील. पण पहिल्याने या संस्कृतीच्या बाहेर पडूया.

६८ अशी ही भारतीय समाजाची परवड पूर्वापार का चालू आहे? असा कुणाला विचार सुचला नाही, की असे आपणा भारतीयांचे सर्वांगीण पराभव का होत आहेत? सर्वत्र चाललेली दुर्दशा पाहून कोणी का बिथरले नाही? दारिद्र्याच्या परमावधीत अनंत काल लोळत पडलेल्यांच्या मनात चुकून एकदासुद्धा विचार का आला नाही? अन्यायाच्या, अपमानाच्या, नामु-

क्कीच्या, शरणागतीच्या, निर्लज्जपणाच्या राशीवर राशी समाजाच्या डोक्यावर रचल्या जात असता कुठेही विरोध कसा झाला नाही ? चार विरोधकांना एके ठिकाणी जमून मोडकी तोडकी का असेना पण एकही फळी का उभारता आली नाही ? निदान आधुनिक काळात तरी ती उभारता यायला पाहिजे होती. ती अद्यापि नाही. संत-महंतांनी आणि ज्ञानेश्वरांनी जेव्हा भलताच उपदेश सुरू केला तेव्हा तरी गांजलेल्या समाजाने काही आवाज उठवावयास पाहिजे होता—तो नाही.

६९ ज्यांच्या मनावर आधुनिक विचाराचा पुसट ठसाही उमटणे शक्य नव्हते त्या ऋषीमुनींच्या कालात मात्र जरूर मोठा उठाव दिसतो. भारतीय पुराण पुरुषांनी संपादिलेल्या अनेक थोतांडावर नास्तिकांनी जबरदस्त कोरडे ओढले होते. त्यावेळी समाजात थोडीतरी वैचारिक धुगधुगी होती. पण त्यानंतर भारतीय संस्कृतीचे जे उद्दिष्ट ते साधल्यासारखे दिसते ! त्यानंतर समाज इतका मेला की त्यातून थोडासुद्धा वैचारिक विरोधाचा आवाज निघू शकला नाही. भारतीय वैचारिकांची ही नामर्दाई आहे. भारतीय विचारवंतानी समाजाला नामुष्कीच्या आगीत सोडून दिले. भयंकर अंगचुकारपणा केला. भारतात विचार करू शकणारे प्राणी नाहीतच हे सिद्ध केले. कोणत्याही देशाचा इतिहास हा त्या देशातील लोकांच्या कर्तबगारीचे प्रतिबिंब दाखवितो.

७० दिवसेदिवस उठणाऱ्या हजारो झोपडपट्ट्याखेरीज आमचे दुसरे कसले प्रतिबिंब दाखवता येण्यासारखे आहे ? नैतिक अधोगती ही संस्कृतीचीच एक पायरी होऊ शकते हे यावरून सिद्ध होते. इतके सर्व विवेचन झाल्यावर कोणी तरी विचारेलच की " मग आता करावे तरी काय " ?

७१ याला एकच उत्तर—विचार करायला शिकावे, विचाराला भिऊन पळून जाऊ नये. विचार करण्यास चुकू नये. आपल्यासाठी दुसऱ्यास विचार करायला लावू नये. येणाऱ्या प्रत्येक प्रसंगास स्वतः विचाराने तोंड द्यावे. परंपरेने आलेले आहे ते

बरोबर असले पाहिजे असे चुकूनही मानू नये. प्रत्येक घटनेत बुद्धिप्रामाण्य मानावे. जे बुद्धीच्या चौकशीला टिकत नाही ते अजिबात मानू नये. यासाठी बुद्धिवादाचे नवे युग सुरू केले पाहिजे. लहानपणापासून बुद्धिप्रधान शिक्षण बालकास दिले पाहिजे. सर्व शिक्षणात बुद्धिवादी दृष्टिकोन ठेवला पाहिजे. सर्व साहित्यातून वैचारिक प्रचार केला पाहिजे. वर्तमानपत्रे, मासिके, भित्तिपत्रे, सिनेमा, रेडिओ, टी. व्ही. या सर्वांवरून बुद्धिप्रधान विचार मांडले पाहिजेत, हजारो कार्यकर्त्यांनी भाषणे, परिसंवाद, वादविवाद घडवून आणून सर्व वातावरण वैचारिक क्रांतिमय करून टाकले पाहिजे. तरच या जड भारतीय मनावर काही परिणाम होईल.

७२ शेवटी असेही कोणी विचारील की अशी विचारक्रांती कशासाठी तर त्यासही उत्तर एकच आहे–भारतीय दारिद्र्य घालवण्यासाठी ! भारतीय दारिद्र्याचा उगम निर्बुद्धतेत आहे. त्यातून बाहेर पडायचे असेल तर बुद्धिवाद हा एकच उपाय आहे.

७३ शंभरात एक बुद्धिवादी सापडणे अवघड असते, याची जाणीव आहे. पण त्याचबरोबर असा जो एक सापडतो तो शंभरापेक्षा जास्ती हिम्मतबहाद्दर असतो याचीही जाणीव आहे ! आधुनिक युगात माणसाच्या अंगात नवे रक्त घालता येते पण यंत्राने अंगात नवे विचार घालता येत नाहीत त्याला काय करावे !

७४ बुद्धिवाद्यांच्या समोर मोठे संघर्ष उभे आहेत हे त्यांनी ध्यानात घ्यावे. त्यांच्यावर संकटे येतील, त्यांची परीक्षा होईल, त्यांना वेळप्रसंगी अग्निदिव्य करावे लागेल. बुद्धिवाद म्हणजे हृदयपरिवर्तन नव्हे, सर्वोदय नव्हे हे जाणून असावे. बुद्धिवाद बहुजन समाजाने आपण होऊन स्वीकारल्याचे उदाहरण सापडत नाही. या पुराणपुरुष भारताने अनेक बुद्धिवाद गिळून फस्त केले आहेत. अशा या भयंकर राक्षसाशी गाठ आहे हे समजून असावे.

७५ आज जगाचे चित्र कसे दिसत आहे– ? पृथ्वीवर राष्ट्रांचे गट

निर्माण झाले आहेत. दोन भली मोठी शक्तिमान राष्ट्रे आपल्या-भोवती लहान राष्ट्रांचे गट जमवत आहेत. ही बलाढ्य राष्ट्रे एकमेकासमोर दंड थोपटून उभी आहेत. यांची केव्हा जुंपेल त्याचा नेम नाही. तटस्थ राष्ट्रे मुठीत जीव धरून उभी आहेत. केव्हा ठिणगी पडते आणि जगभर आगडोंब उठतो याची वाट पाहात आहेत.

७६ मुसलमान राष्ट्रांत एकच गोंधळ माजला आहे. इराक, इराण अफगाणिस्तान, इजिप्त, पाकिस्तान इत्यादी राष्ट्रे दंगलग्रस्त आहेत. या युद्धसदृश परिस्थितीला, वरून पाहिले तर निर-निराळी कारणे दिसतात पण थोडा खोलवर अभ्यासू नजरेने विचार केला तर सर्व संघर्षाखाली सर्वांना लागू असे एकच सूत्र दिसते. ही राष्ट्रे जरी एकमेकांत भांडत असली तरी ती या ना त्या स्वरूपात धार्मिक छळाविरुद्ध उठाव करण्यात गुंतली आहेत. मुसलमानी धर्मवेड म्हणून जो ऐतिहासिक प्रकार दोन हजार वर्षे चालू आहे, त्याचे आता स्वतःच्याच विरुद्ध बंड करण्यामध्ये रूपांतर होत आहे. जुन्या विरुद्ध नव्या मुसलमान विचारांचा हा लढा आहे. तो बराचसा युरोपीय पुनरुत्थापनासारखा आहे. यात आज ना उद्या नव्यांचा विजय होणार हे नक्की

७७ ख्रिश्चन धर्माने पुराणमतवादातून आपली सुटका करून घेतली, आता मुसलमान राष्ट्रे आपली सुटका करून घेण्याचे चळवळीत गुंतली आहेत. बुद्ध धर्माने तर मोठ्या प्रमाणावर साम्यवाद स्वीकारला आहे. राहता राहिला एक हिंदू धर्मच. तो निपचित पडला आहे. त्याची महानिद्रा चालू आहे. दोन बाजूस दोन नव्या दमाची, नव्या विचाराची राज्ये स्थापन होत आहेत. हिंदुस्थान मध्यभागी गाढ निद्रा घेत आहे. इतरांना काही वाटो पण आपण आपल्यामध्ये बोलताना अगर विचार करताना स्पष्टपणे कबूल करावयास पाहिजे की आजच्याइतका सर्व-दृष्टींनी हतबल झालेला हिंदुस्थान या पूर्वी कधीही नव्हता. वरून सर्व सुसूत्र दिसत आहे पण आतून सर्व निकामी झाले आहे. कुठेच आपण भक्कम पायावर उभे नाही. अशा वेळी जर बाहेरून हल्ला झाला तर आपला टिकाव लागणार नाही. हा हा म्हणता

अखिल हिंदुस्थान काबीज करण्याची शक्ती असलेली राष्ट्रे आसपास आहेत. त्यांचे तावडीतून सुटका नाही. आपण जुन्यालाच धरून राहिलो तर पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही. तेव्हा बंधूनो जागे व्हा ! अजून वेळ गेली नाही तोवर जागे व्हा. जुन्या भारतीय संस्कृतीच्या मगरमिठीतून लवकर सुटका करून घ्या. भारतीयांनो, आपल्यापाशी बुद्धी नाही असे नाही. फक्त त्या बुद्धीला नीट वळण नाही. ते वळण म्हणजेच बुद्धिवादी विचार ! ते जर केलेत तर भारतीय सुखसमृद्धीला पारावार राहणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९८८
क्र. २३९०४
मुंबई ठाणा (स्थल प्रत)

REFBK-0023904

सेहेचाळीस